रायगड, नवी मुंबई
# राम प्रहर
◆ वर्ष १६ ◆ अंक १५८
www.ramprahar.com
सोमवार, २५ डिसेंबर २०२३ ◆ पाने ८ ◆ किंमत ₹ २

## अंतरंग

कर्जत वेणगावमधील युवकाची हत्या; तियांना अटक/२
सुशोभिकरणाने झळाळून निघाले 'भोगावती'चे सौंदर्य/५
एक धाव अनाथ मुलांसाठी! कामोठ्यात मॅरेथॉन उत्साहात/८

## राज्याचे कृषीमंत्री धनंजय मुंडे कोरोना पॉझिटिव्ह

**मुंबई** : राज्याचे कृषीमंत्री धनंजय मुंडे यांना कोरोनाची लागण झाली आहे. त्यांनी स्वतः फेसबुक आणि एक्सवर याबाबतची माहिती दिली. मंत्री धनंजय मुंडे यांनी केलेल्या पोस्टमध्ये म्हटले आहे की, नागपूर अधिवेशन संपल्यानंतर अस्वस्थ वाटू लागल्याने मी कोविड-१९ तपासणी केली असता पुन्हा एकदा पॉझिटिव्ह असल्याचे आढळून आले आहे. मला सध्या फारसा त्रास नाही, परंतु डॉक्टरांच्या सल्ल्याने मी मागील चार दिवसांपासून क्वारन्टाईन (विलगीकरण कक्षात) राहून योग्य उपचार घेत आहे. काळजी करण्याचे कोणतेही कारण नाही. मी लवकरच बरा होऊन आपल्या सर्वांच्या सेवेत पुन्हा दाखल होईन. सध्या थंडीचे वातावरण असून कोविडच्या नव्या व्हेरिएंटने शिरकाव केला आहे. त्या दृष्टीने घाबरून न जाता सर्वांनी आरोग्याची योग्य ती काळजी घ्यावी.



# शेतकऱ्यांच्या हितासाठी भाजप कटिबद्ध

## आमदार प्रशांत ठाकूर यांची निर्धार मेळाव्यात ग्वाही






**पनवेल : प्रतिनिधी**

नैना प्रकल्प येणार असेल तर त्यांनी सगळ्या सुविधा वेळेत दिल्या पाहिजेत. कोणत्याही शेतकऱ्यावर अन्याय व्हायला नको. रस्ते, उद्याने, मूलभूत सुविधा वेळीच देणे गरजेचे आहे, शिवाय हे करताना येथील शेतकऱ्यांना रोजगार दिला पाहिजे. यासाठी भारतीय जनता पक्ष सातत्याने भूमिपुत्र, शेतकरी, कष्टकरी, प्रकल्पग्रस्तांच्या पाठीशी ठामपणे उभा आहे. शेतकऱ्यांच्या हिताचे जे आहे ते आम्हाला करायचे आहे, असा निर्धार भाजपचे मावळ लोकसभा निवडणूक प्रमुख आमदार प्रशांत ठाकूर यांनी रविवारी (दि.२४) येथे व्यक्त केला. ते निर्धार मेळाव्यात बोलत होते.

नैना प्रकल्पग्रस्तांना न्याय मिळवून देण्यासाठी भाजपच्या वतीने पनवेलमधील आद्य क्रांतिवीर वासुदेव बळवंत फडके नाट्यगृहात निर्धार मेळावा आयोजित करण्यात आला होता. या मेळाव्यास आमदार महेश बालदी, भाजप तालुका अध्यक्ष अरुणशेठ भगत, उपाध्यक्ष संजय पाटील, सरचिटणीस राजेंद्र पाटील, खालापूर तालुका अध्यक्ष प्रवीण मोरे, माजी नगरसेवक हरेश केणी, बबन मुकादम, माजी नगरसेविका दर्शना भोईर, युवा मोर्चा जिल्हाध्यक्ष मयूरेश नेतकर, भाजप अनुसूचित जाती मोर्चा जिल्हाध्यक्ष अमित जाधव, माजी जि.प. सदस्य ज्ञानेश्वर घरत, ज्ञानेश्वर भोईर, केळवणे जि.प.विभागीय अध्यक्ष मंगेश वाकडीकर, माजी पं.स. सदस्य भूपेंद्र पाटील, शिवकर ग्रामपंचायतीचे सरपंच आनंद ढवळे, नांदगाव सरपंच विजेता भोईर, उसर्लीचे माजी सरपंच विजय भगत, सिडकोचे अधिकारी मानकर, जनसंपर्क अधिकारी मोहन निनावे आदींसह मोठ्या संख्येने प्रकल्पग्रस्त शेतकरी उपस्थित होते.

या वेळी आमदार प्रशांत ठाकूर यांनी नैना प्रकल्पाबद्दल लोकांच्या मनात असलेल्या शंका-कुशंका, निर्माण झालेल्या प्रश्नांची उत्तरे मिळवण्यासाठी व ज्या शेतकऱ्यांची जमीन गेली आहे त्यांना न्याय मिळवून देण्यासाठी आज हा निर्धार मेळावा आयोजित केला असून यासाठी लोकनेते दि. बा. पाटीलसाहेबांचा आदर्श डोळ्यासमोर ठेवला असल्याचे सांगितले. ते पुढे म्हणाले की, जे जनतेच्या हिताचे आहे ते आम्हाला करायचे आहे. **(पान २ वर..)**

### आम्ही विकासाच्या बाजूने -आमदार महेश बालदी

या वेळी आमदार महेश बालदी यांनी सांगितले की, सिडको आणि सरकार यांच्यामध्ये आम्ही त्यांना जोडणाऱ्या पुलाचे काम करीत आहोत. नैना



प्रकल्पग्रस्तांसाठी आंदोलन करणाऱ्या विरोधकांच्या बेगडी आंदोलनाची खिल्ली उडवताना त्यांनी म्हटले की, विरोधकांनी आंदोलन केले त्यांचा अजेंडा एकाच होता आमदारांना शिव्या देण्याचा. त्याने आम्हाला काही फरक पडला नाही. लोक जमत नाहीत म्हणून कुस्त्या ठेवल्या, नाटक ठेवले आणि खाऊन-पिऊन उपोषण केले. त्यांचे बरे असते प्रदर्शनासाठी उपोषण करायचे तेही साखळी उपोषण करायचे म्हणजे खाऊन-पिऊन उपोषण. उपोषण अर्धवट सोडून नागपूरला कोण गेले ज्यांनी प्लॉट घेतले आहेत, कारण त्यांची पॉलिसी शेतकऱ्यांना गोंधळात टाकण्याची आहे. आम्ही नैनाच्या बाजूचे म्हणजे त्यांच्या सगळ्या गोष्टी मान्य करीत नाही. आम्ही विकासाच्या बाजूचे आहोत.

### सिडको अधिकाऱ्यांनीही स्पष्ट केली भूमिका

प्रारंभी सिडकोचे जनसंपर्क अधिकारी मोहन निनावे यांनी १७४ गावांचा समावेश असलेल्या नैना प्रकल्पाची प्रेझेंन्टेशनद्वारे माहिती दिली. त्यानंतर सिडकोचे अधिकारी मानकर यांनी प्रकल्पग्रस्त न म्हणता तुम्ही स्वत:ला प्रकल्प भागधारक म्हणून घ्या, असे सांगून शेतकऱ्यांनी उपस्थित केलेल्या प्रश्नांची उत्तरे दिली. अंशदान शुल्क हे शेतकऱ्याला भरायला लागणार नसल्याचे सांगून त्याला शासनाची स्थगिती असल्याचे ते म्हणाले. मूलभूत सुविधा आणि पाणी, रस्ते याबाबत प्रस्ताव सुरू असल्याची माहिती त्यांनी दिली. ज्यांच्या घरांचा किंवा चुकीचे भूखंड दिले असल्याचा प्रश्न असेल तोही आम्ही चर्चा करून सोडवू, असे आश्वासन त्यांनी या वेळी दिले.

# माणगावमध्ये स्फोटकांनी भरलेली गाडी पकडली

## तिघे गजाआड; डीटोनेटर, जिलेटिन कांड्या जप्त

**माणगाव : प्रतिनिधी**

बेकायदेशीर स्फोटक पदार्थ डीटोनेटर, जिलेटिन कांड्यांची टेम्पोतून वाहतूक करीत असताना मिळून आलेल्या टोळीला माणगाव पोलिसांनी गजाआड केले असून त्यांच्याकडून सुमारे १३ लाख रुपयांचे सहित्य जप्त करण्यात आल्याची माहिती रायगड जिल्हा पोलीस अधीक्षक सोमनाथ घार्गे यांनी रविवारी (दि. २४) पत्रकार परिषदेत दिली.

माणगाव पोलीस ठाण्याचे निरीक्षक राजेंद्र पाटील यांना अवैध स्फोटक पदार्थांची वाहतूक होत असल्याची गोपनीय माहिती मिळाल्याने त्यांनी पथक तयार करून माणगाव-निजामपूर मार्गावर रवाना केले. या पथकाने शनिवारी (दि.२३) सकाळी संशयित बोलेरो टेम्पो (एमएच १२-एसएफ ४३२२) थांबवून चालक विक्रम गोपाळदास जाट (वय २६, रा. राजस्थान, सध्या घोटावडे, जि.पुणे) याच्याकडे चौकशी व तपासणी केली असता गाडीमध्ये ९० हजार ८०० रुपये किमतीचे एकूण चार बॉक्स इलेक्ट्रिक डीटोनेटर, एक लाख ७० हजार रुपये किमतीचे जिलेटिन कांड्यांचे ५० बॉक्स आढळले. ही स्फोटके आणि १० लाख रुपये किमतीचा टेम्पो असा एकूण १२ लाख ६० हजार ८०० रुपये किमतीचा मुद्देमाल पोलिसांनी जप्त केला.

पोलिसांनी अधिक चौकशी केली असता ही स्फोटक ज्यांच्याकडे परवाना नाही त्यांना विकत असल्याचे सांगितल्यावर पाली व पेण येथून दोन आरोपींना अटक करून त्यांच्याकडून जिलेटीन व डीटोनेटर अशी स्फोटके हस्तगत करण्यात आली. या प्रकरणी विक्रम गोपालदास जाट, विठ्ठल तुकाराम राठोड, राजेश सुभेसिंग राठोड या तीन आरोपींना अटक करण्यात आली असून मुख्य सूत्रधाराचा शोध सुरू आहे.

पत्रकार परिषदेला माणगाव तालुका उपविभागीय पोलीस अधिकारी नितीनकुमार पोंदकुळे, निरीक्षक राजेंद्र पाटील, सहाय्यक निरीक्षक एन. डी. लहांगे, उपनिरीक्षक अस्मिता पाटील, दिनेश आघाव, किर्तीकुमार गायकवाड, सूर्यकांत भोजकर आदी उपस्थित होते.





पनवेल : गव्हाण व न्हावे ग्रामपंचायत हद्दीतील न्हावा-शिवडी प्रकल्पबाधित मच्छीमारांना नुकसानभरपाई मिळण्याबाबत चर्चा करण्यासाठी माजी खासदार लोकनेते रामशेठ ठाकूर यांच्या उपस्थितीत शनिवारी बैठक झाली. रामशेठ ठाकूर स्पोर्ट्स कॉम्प्लेक्समध्ये झालेल्या या बैठकीस आमदार प्रशांत ठाकूर, भाजपचे ज्येष्ठ नेते वाय.टी. देशमुख, तालुका अध्यक्ष अरुणशेठ भगत, शहराध्यक्ष अनिल भगत, कामगार नेते सुरेश पाटील, गव्हाण ग्रामपंचायतीचे उपसरपंच विजय घरत, न्हावे ग्रामपंचायतीचे सरपंच विजेंद्र पाटील, उपसरपंच राजेश म्हात्रे, गव्हाण ग्रामपंचायत सदस्य योगिता भगत, संजय भगत, भाऊशेठ पाटील, चंद्रकांत भोईर यांच्यासह न्हावे आणि गव्हाण ग्रामपंचायत सदस्य, पदाधिकारी, ग्रामस्थ बहुसंख्येने उपस्थित होते. मच्छीमारांना नुकसानभरपाई मिळण्यासाठी एमएमआरडीएकडे पाठपुरावा करण्याचे या वेळी ठरले.

# रायगडचे समुद्रकिनारे पर्यटकांनी फुलले

**अलिबाग : प्रतिनिधी**

सलग सुट्ट्यांमुळे लोक घराबाहेर पडले. त्यामुळे मुंबई, पुण्यापासून जवळ असलेली रायगड जिल्ह्यातील पर्यटनस्थळे विशेषतः समुद्रकिनारे पर्यटकांच्या गर्दीने फुलून गेले. अलिबागसह मुरूड, काशीद, नागाव, दिवेआगर, श्रीवर्धनच्या किनाऱ्यांवर पर्यटकांची तोबा गर्दी दिसून आली.

शनिवार, रविवारचा वीकेण्ड आणि त्याला लागून येणारा ख्रिसम (नाताळ) यामुळे लोकांनी फिरायला जाण्याचा बेत आखला. काहींनी थर्टीफर्स्टला गर्दी होईल म्हणून आताच कुटुंबासह फिरण्याचा बेत आखून तो तडीस नेला. त्यासाठी रायगडच्या किनाऱ्यांना मोठी पसंती दिल्याचे पहायला मिळते. मुंबईहून जवळ असलेल्या तसेच मिनी गोवा म्हणून पर्यटकांकडून प्रमुख पसंती दिली जाणाऱ्या अलिबाग व मुरूडकडे पर्यटक दाखल झाले.

दिवाळीपासून रायगडच्या सागरी पर्यटन हंगामाला सुरुवात झाली आहे. नाताळ आणि थर्टीफर्स्ट हे इथल्या व्यावसायिकांसाठी सर्वांत मोठ्या पर्वणीचे दिवस म्हणून ओळखले जातात. पर्यटकांच्या आगमनाने व्यावसायिकदेखील खुश आहेत. इथल्या हॉटेल व्यावसायिकांबरोबरच घरगुती कॉटेजेस, छोटेमोठे विक्रेते यांना चांगला व्यवसाय उपलब्ध झाला आहे. किनारपट्टीवरील कॉटेजेस, हॉटेल्स, रिसॉर्टचे बुकींग फुल्ल झाले आहे. शिवाय जेथे घरगुती राहण्याची व्यवस्था आहे तेथेही राहणे पर्यटकांनी पसंत केले आहे. बुकींग फुल असले तरी अजूनही पर्यटकांकडून रूमसाठी विचारणा होते आहे.

पर्यटकांची ही रेलचेल नवीन वर्षाची सकाळ उजाडेपर्यंत अशीच कायम राहणार आहे.




## काँग्रेस नेते सुनील केदार यांची आमदारकी रद्द

**नागपूर : प्रतिनिधी**

नागपूर जिल्हा बँक घोटाळाप्रकरणी काँग्रेस नेते, आमदार सुनील केदार यांना पाच वर्षांची शिक्षा सुनावण्यात आली आहे. त्यानंतर सुनील केदार यांची आमदारकी रद्द करण्यात आली आहे. नागपूर पोलिसांनी विधिमंडळाला सुनील केदार यांच्या शिक्षेची माहिती दिली असून न्यायालयाचे आदेश पाठवले होते. त्यानुसार विधिमंडळाने केदार यांच्या आमदारकीचा निर्णय घेतला आहे.



नागपूर जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेत २००२मध्ये १५० कोटींहून अधिक रुपयांचा घोटाळा उघडकीस आला होता. तेव्हा केदार बँकेचे अध्यक्ष होते. तेच या खटल्यातील मुख्य आरोपी आहेत. खासगी कंपन्यांच्या मदतीने बँकेच्या रकमेतून सरकारी रोखे (शेयर्स) खरेदी केले गेले होते, मात्र पुढे या कंपन्यांकडून कधीच बँकेला खरेदी केलेले रोख मिळाले नाही. ते बँकेच्या नावाने झाले नव्हते. धक्कादायक म्हणजे पुढे रोखे खरेदी करणाऱ्या या खासगी कंपन्या दिवाळखोरीत निघाल्या. या कंपन्यांनी कधीच बँकेला सरकारी रोखही दिले नाही आणि बँकेची रक्कमही परत केली नाही. त्यामुळे शेतकऱ्यांचे पैसेही बुडाले. तेव्हा फौजदारी गुन्ह्याची नोंद होऊन पुढे सीआयडीकडे या प्रकरणाचा तपास देण्यात आला होता.






# ओबीसी आरक्षणाला धक्का लावणार नाही

## उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांचा पुनरूच्चार

**मुंबई : प्रतिनिधी**

मराठा आरक्षणाच्या प्रश्नावर राज्य सरकार गंभीर असून ओबीसी समाजाच्या आरक्षणाला कोणताही धक्का न लावता मराठ्यांना आरक्षण देणार असल्याचा पुनरूच्चार राज्याचे उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी केला आहे, तसेच राम मंदिराच्या निर्मितीने देशात नवा अध्याय सुरू होणार असल्याचा विश्वासही त्यांनी व्यक्त केला.

मनोज जरांगे यांनी मराठा आरक्षणाच्या प्रश्नावर २० जानेवारीपासून मुंबईत आंदोलन करणार असल्याचे जाहीर केले आहे. त्यावर प्रतिक्रिया देताना मुख्यमंत्री फडणवीस म्हणाले की, हे सरकार अतिशय सकारात्मकतेने काम करीत आहे. मुख्यमंत्री हे स्वतः या संपूर्ण प्रकरणात लक्ष घालून आहेत. आज राज्य मागास आयोगाने वेगाने काम सुरू केले आहे. शिंदे समितीने दुसरा अहवाल सादर केला असून तिसरा अहवाल ही लवकरच अपेक्षित आहे. त्यामध्ये मोठ्या प्रमाणात निजामकालीन नोंदी या हैदराबादमधून आम्ही प्राप्त करून घेत आहोत.



राज्य सरकारची सकारात्मकता बघता, अशा प्रकारचा निर्णय त्यांनी घेऊ नये आणि अशाप्रकारे राज्य सरकार योग्य काम करीत आहे, हे लक्षात आल्यानंतर तसा निर्णय तो घेणार नाहीत.

२२ जानेवारीकरीता आदेशाची आवश्यकता नाही, इतका प्रचंड जल्लोष आणि उत्साह लोकांमध्ये आहे. हा उत्साह अक्षरक्षः ओसांडून वाहत आहे, कारण जवळपास ५० ते ६० वर्षे जो संघर्ष चालला, त्या संघर्षानंतर पुन्हा एकदा रामलल्ला हे त्यांच्या प्रत्यक्ष जन्मस्थानी स्थापित होत आहेत. मला विश्वास आहे की त्यांची स्थापना एका नवीन अध्यायाची सुरुवात असेल. एक आत्मनिर्भर, आत्मअभिमानी असा स्वाभिमानी भारत आपल्याला त्या दिवसापासून निश्चितच पहायला मिळेल. म्हणून आम्ही सगळेदेखील अत्यंत उत्कंठेने त्या दिवसाची वाट पाहत आहोत.

### विरोधकांची आघाडी स्वार्थाकरिता

विरोधकांची इंडिया आघाडी ही स्वार्थाकरीता असल्याचे सांगत देवेंद्र फडणवीस म्हणाले की, इंडिया अलायन्स किंवा इंडिया आघाडी ही कुठलीही आघाडी नाही, ज्या लोकांना असे वाटते की, मोदीजींमुळे त्यांच्या भ्रष्टाचाराचे दुकान आणि त्यांच्या परिवारवादाचे दुकान बंद होणार आहे, अशी लोकं एकत्र आली आहेत. त्यामुळे स्वार्थाकरता जे एकत्र येतात, ते स्वार्था करताच विघटित होतात. स्वार्थाकरीता त्यांचे विघटन रोज आपल्याला पहायला मिळेल.

# जागो ग्राहक जागो पथनाट्यातून प्रिझम संस्थेने केली जनजागृती



**अलिबाग : रामप्रहर वृत्त**

अलिबाग बसस्थानक व समुद्रकिनाऱ्यावर राष्ट्रीय ग्राहक दिनानिमित्त जिल्हा पुरवठा विभागाच्या वतीने अधिकारी सर्जेराव सोनवणे यांच्या प्रमुख मार्गदर्शनाखाली जागो ग्राहक, जागो या पथनाट्यातून जनजागृती करण्यात आली.

ग्राहक म्हणून कोणत्याही हॉटेलमध्ये मोफत पाणी पिऊ शकता व स्वच्छतागृहाचा वापर करू शकता, दुकानदाराकडे सुट्टे पैसे नाही म्हणून दुकानदार गोळ्या चॉकलेट देऊ शकत नाही. एखाद्या कंपनीने वचन दिलेले असल्यास दिलेले वचन न पाळल्यास कंपनीच्या विरोधात कारवाई केली जाऊ शकते. शैक्षणिक संस्थेची गुणवत्ता चांगली नसल्यास त्याच्या विरोधात कारवाई केली जाऊ शकते.

रुग्णालयातदेखील हलगर्जीपणा केल्यामुळे त्याच्या विरोधात कारवाई केली जाऊ शकते. चित्रपटगृहांमध्ये खाद्यपदार्थ नेण्यास बंदी नाही, अशी विविध माहिती या पथनाट्यातून देण्यात आली. या वेळी या कार्यक्रमास जिल्हा पुरवठा कार्यालय रायगड अलिबाग या कार्यालयातील अधिकारी व कर्मचारी तसेच सहाय्यक आयुक्त अन्न व औषध प्रशासन पेण व सहाय्यक नियंत्रण वैद्यमापन विभाग या कार्यालयातील अधिकारी व कर्मचारी, तपस्वी नंदकुमार गोंधळी उपस्थित होते.

पथनाट्यात प्रतिक कोळी, विनोद नाईक, नेहा जावसेन, सार्थक गायकवाड, नेहा पाटील, हर्षदा भगत, दर्श नागोठकर, निधी पाटील आदी कलाकार सहभागी झाले होते.

# कर्जत वेणगाव येथील युवकाची दगडाने ठेचून हत्या

**कर्जत : प्रतिनिधी**

तालुक्यातील वेणगाव येथील एका युवकाची अज्ञातांकडून दगडाने ठेचून निर्घृण हत्या करण्यात आल्याची घटना घडली. याबाबत कर्जत पोलीस ठाण्यात हत्येचा गुन्हा दाखल करण्यात आला असून आरोपीला पोलिसांनी सहा तासांत ताब्यात घेतले.

याबाबत मिळालेल्या माहितीनुसार, मोठे वेणगाव येथील कुणाल उर्फ रॉनी आंब्रे या २८ वर्षीय युवकाची हत्या करण्यात आली आहे. रविवारी (दि. २४) सकाळी गावाच्या बाहेरील नाल्यात कुणालचा मृतदेह गावकऱ्यांना दिसला. त्यानंतर तत्काळ कर्जत पोलिसांशी संपर्क करण्यात आला. पोलिसांना माहिती मिळताच कर्जत पोलीस निरीक्षक सुरेंद्र गरड कर्मचाऱ्यांसह घटनास्थळी हजर झाले. कुणालला दगडाने ठेचून, लोखंडी सळईच्या साहाय्याने आघात केल्याने त्याचा मृत्यू झाला असेल असा अंदाज वर्तवण्यात येत आहे. त्याच्यावर यापूर्वीदेखील तीन हल्ले झाले होते. याबाबत तक्रार देखील त्याने पोलीस ठाण्यात दिली होती. तेव्हा ही हत्या पूर्ववैमानस्य असावी, असा अंदाज आहे.



उपविभागीय पोलीस अधिकारी विजय लगारे यांनीदेखील घटनास्थळी भेट दिली. कर्जत पोलीस ठाण्यात खुनाचा गुन्हा दाखल करण्यात आला असून पोलीस निरीक्षक सुरेंद्र गरड यांच्या मार्गदर्शनाखाली अधिक तपास करण्यात येत आहे.

### सहा तासांत तिघांना अटक

*कर्जत पोलिसांनी आरोपींचा शोध सुरू करून गोपनीय माहिती काढून गणेश मधुकर पालकर, राकेश पांडूरंग चौधरी, प्रल्हाद प्रवीण सावंत (रा.मोठे वेणगाव, कर्जत) यांचे मोबाईल नंबर व फोटो प्राप्त केले. आरोपी हे पनवेलकडे जात असल्याचे समजले. या मार्गवर पथकाने सापळा रचला. त्या वेळी पांढऱ्या रंगाची महिंद्रा कार (एमएच ४६ एल ०५६७) मधून जात असल्याचे दिसले. पोलिसांनी त्यांना वाहन थांबवण्याचा इशारा केला असता ते न थांबता पळून जाऊ लागले. त्या वेळी वाहनाचा पथकाने पाठलाग करून गाडी अडवून आरोपींस शिताफीने ताब्यात घेतले. त्यांची चौकशी केली असता त्यांनी गुन्हा केल्याचे कबुल केले. त्यांच्याविरोधात भादंविसं. कलम ३०२, ३४ अन्वये गुन्हा नोंदविण्यात आला आहे.*

### बल्कर नदीत कोसळला; जीवितहानी नाही

**पनवेल : वार्ताहर**

तालुक्यातील वाजे गावाजवळील नदीत सिमेंट काँक्रीटचा बल्कर कोसळल्याची घटना घडली आहे. या दुर्घटनेत कोणतीही जीवितहानी झाली नाही.

वाजेजवळ रस्त्याचे काम सुरू आहे. या कामासाठी सिमेंटचा बल्कर आणण्यात आला होता. बल्कर नदीच्या बाजूने जात असताना चालकाचे नियंत्रण सुटल्याने तो नदीत कोसळला. दुर्घटनेनंतर चालक बल्करमधून तत्काळ बाहेर पडला.

# म्हाडाच्या संक्रमण शिबिरातील रहिवाशांना मिळणार हक्काचे घर

**मुंबई : प्रतिनिधी**

म्हाडाच्या मुंबई इमारत दुरुस्ती आणि पुनर्रचना मंडळाकडून बृहतसुचीवरील २६५ पात्र अर्जदारांसाठीच्या संगणकीय सोडतीला अखेर मुहूर्त मिळाला आहे.

२८ डिसेंबरला दुपारी १ वाजता म्हाडाच्या वांद्र्यातील मुख्यालयात ही संगणकीय सोडत काढण्यात येणार असून त्यासाठी ४०० घरे उपलब्ध आहेत. बऱ्याच वर्षांनंतर काढण्यात येणाऱ्या या सोडतीच्या माध्यमातून वर्षानुवर्षे म्हाडाच्या संक्रमण शिबिरात राहणाऱ्या २६५ भाडेकरूंचे हक्काच्या घराचे स्वप्न पूर्ण होणार आहे.

बृहत सुचीवरील ४०० घरांसाठी आणि २६५ अर्जदारांसाठी २८ डिसेंबरला सोडत काढली जाणार असल्याची माहिती म्हाडाचे उपाध्यक्ष संजीव जयस्वाल यांनी दिली. संगणकीय पद्धतीने निघणारी ही पहिली सोडत आहे. या सोडतीमुळे बृहत सूची प्रक्रियेत पारदर्शकता येणार असून गैरप्रकाराला आळा बसणार आहे, असा दावाही त्यांनी केला आहे.

# नवी मुंबई पालिका आंतरविभागीय बॅडमिंटन, व्हॉलीबॉल व थ्रोबॉल स्पर्धा



**नवी मुंबई : प्रतिनिधी**

नवी मुंबई पालिकेच्या १ जानेवारी २०२४ रोजीच्या ३२व्या वर्धापन दिनाचे औचित्य साधून महापालिका आंतरविभागीय क्रीडा स्पर्धांचे आयोजन करण्यात आले आहे. त्यास प्रतिसाद लाभला.

बॅडमिंटन स्पर्धेत ३० पुरुष व २२ महिला अधिकारी, कर्मचारी समूह सहभागी झाले होते. पुरुषांमध्ये अंतिम फेरीची लढत राजेंद्र कोळी व सुर्या गझणे विरुद्ध सचिन मस्तुद व सनी पाटील यांच्यामध्ये झाली. यात २१-१६ अशा पाच गुणांच्या फरकाने राजेंद्र कोळी व सुर्या गझणे यांनी विजय संपादन केला.

महिला गटात अंतिम फेरीत अदिती कुवेसकर व रुपाली वाणीवडेकर विरुद्ध प्राजक्ता पिंगळे व प्रतिभा गोल्हार यांच्यामध्ये सामना झाला. यात चार गुणांनी अदिती कुवेसकर व रुपाली वाणीवडेकर यांनी विजेतेपदावर नाव कोरले.

व्हॉलीबॉल स्पर्धेत १० विभागांनी सहभाग नोंदविला. यामध्ये अग्निशमन दल आणि मालमत्ता कर आकारणी यांच्यात अंतिम फेरीचा सामना रंगला. या लढतीमध्ये अग्निशमन विभागाने २१-१८ अशा तीन गुणांनी विजय संपादन करीत विजेतेपद पटकावले.

# घारापुरी बेटावर पर्यटकांच्या सुरक्षेसाठी सज्ज राहण्याचे पोलिसांचे आवाहन

**उरण : प्रतिनिधी**

तालुक्यातील जागतिक कीर्तीच्या घारापुरी बेटावर लेणी पाहण्यासाठी ख्रिसमस, थर्टीफर्स्टनिमित्त येणाऱ्या देशी-विदेशी हजारो पर्यटकांच्या सुरक्षेसाठी बेटावर विविध शासकीय विभागांच्या अधिकाऱ्यांची तातडीने बैठक घेण्यात आली. या बैठकीत पर्यटकांच्या सुरक्षेच्या दृष्टीकोनातून कोणत्याही प्रकारची हयगय होणार नाही, यासाठी सज्ज राहण्याचे आवाहन पोलिसांनी केले आहे.



मोरा सागरी पोलीस ठाण्याचे नवनियुक्त वरिष्ठ पोलीस निरीक्षक औदुंबर पाटील यांच्या मार्गदर्शनाखाली भारतीय पुरातत्व विभागाच्या हॉलमध्ये झालेल्या बैठकीत भारतीय पुरातत्व विभागाचे अधिकारी कैलास शिंदे, महाराष्ट्र मेरीटाईम बोर्डाच्या एलिफंटा विभागाचे बंदर उपनिरिक्षक विनायक करंजे, एलिफंटा सिक्युरिटी गार्डचे प्रमुख अजय झा व त्यांचे सहकारी, गेटवे जलवाहतूक संस्थेचे प्रतिनिधी, ग्रामपंचायतीच्या सरपंच मीना भोईर, उपसरपंच बळीराम ठाकुर, सदस्य सचिन लाड, सदस्या नीता ठाकुर, भारती पांचाळ, अरुणा घरत, तंटामुक्त कमिटीचे अध्यक्ष सोमेश्वर भोईर, माजी उपसरपंच सचिन म्हात्रे, व्यावसायिक तथा ज्येष्ठ नागरिक यशवंत म्हात्रे, लोकल गाईडचे प्रतिनिधी कृष्णा भोईर, ग्रामपंचायतीचे कर्मचारी, ग्रामस्थ उपस्थित होते.

ख्रिसमस, थर्टीफर्स्टनिमित्त बेटावर येणाऱ्या देशी-विदेशी पर्यटकांची संख्या दुपटीने वाढते. त्यामुळे सुरक्षेयंत्रणेसह बेटावरील कार्यरत असलेल्या सर्वच शासकीय विभागांवर अतिरिक्त ताण वाढतो. त्यामुळे बेटावर कार्यरत असलेल्या सर्वच विभागांनी विविध उपाययोजना करण्यावर चर्चा करण्यात आली.

## पान १ वरुन

### शेतकऱ्यांच्या हितासाठी भाजप कटिबद्ध

आज कोणी तरी समजूत करून देतोय की हे आमच्या विरोधात आहे. आमची घरे उठवणार आहेत. जमिनी ताब्यात घेणार आहेत, पण कोणी आपली जमीन ताब्यात घेत नाही. आपल्यासाठी स्कीम बनवत असताना आपले म्हणणे ऐकले जाते. विकासासाठी रस्ते लागतात. अशा वेळी ही जागा द्या सांगणारे शेतकऱ्यांचे दुश्मन असल्याचे सांगितले जाते. सोशल मीडियावर कार्टून बनवली जातात, पण राजकारण बाजूला ठेवून जे शेतकऱ्यांच्या हिताचे आहे तेच झाले पाहिजे, अशी भूमिका आमची व इथे बसलेल्यांची असल्याने आम्ही ताठ मानेने पुढे जाऊ शकतो.

पैसे खाल्ल्याने जे तुरुंगात बसलेत त्यांचे लोक आम्हाला शेतकऱ्यांचे विरोधक बोलतात, पण आम्ही विकासाचे राजकारण करीत असताना कर्नाळा बँक बुडवल्यावर शेतकऱ्यांना पैसे मिळवून देणाऱ्यांना शेतकऱ्यांचा दुष्मन ठरवू पाहत आहेत. आम्ही सिडकोला सांगितले आहे की, नैना प्रकल्प साकारताना कोणाच्याही घरावर नांगर फिरवू नये, कोणाच्याही घराला धक्का लागू नये ही आमची आग्रही मागणी आहे. ती आम्ही त्यांच्याकडून मान्य करून घेणार आहोत. रस्त्यासाठी किवा इतर सुविधांसाठी जर सिडकोला जागा लागणार असेल तर बाजार भावाप्रमाणे आणि अन्य निकषाप्रमाणे पैसे दिले पाहिजेत, असेही आमदार प्रशांत ठाकूर म्हणाले.



# महाराष्ट्राचे खो-खो संघ जाहीर

## वैभव मोरे, दिपाली राठोडकडे धुरा

**नंदूरबार : प्रतिनिधी**

नंदूरबार येथे झालेल्या राज्य अजिंक्यपद व निवड चाचणी खो-खो स्पर्धेतून महाराष्ट्राचे कुमार व मुली संघ सचिव ॲड. गोविंद शर्मा यांनी जाहीर केले. हे संघ छत्तसगड येथे होणाऱ्या ४२व्या कुमार-मुली राष्ट्रीय अजिंक्यपद स्पर्धेत सहभागी होणार आहेत.

कुमार संघाच्या कर्णधारपदी वैभव मोरे (ठाणे), तर मुलींच्या संघाच्या कर्णधारपदी दिपाली राठोड (पुणे) यांची निवड झाली आहे.

संघाच्या निवडीसाठी तज्ज्ञ समिती नियुक्त करण्यात आली होती. निवडलेल्या संघाचे उपमुख्यमंत्री अजित पवार, महाराष्ट्र खो-खो असोसिएशनचे अध्यक्ष संजीवराजे निंबाळकर, खो-खो फेडरेशनचे सहसचिव डॉ. चंद्रजित जाधव, महाराष्ट्र खो-खो असोसिएशनचे सचिव ॲड.गोविंद शर्मा, कार्याध्यक्ष सचिन गोडबोले, खजिनदार ॲड. अरुण देशमुख, संदीप तावडे यांच्यासह असोसिएशनच्या पदाधिकाऱ्यांनी अभिनंदन केले असून सामन्यांसाठी शुभेच्छा दिल्या.





**संघ पुढीलप्रमाणे :**

**कुमार गट :** वैभव मोरे (ठाणे, कर्णधार), गणेश बोरकर, फराज शेख, कृष्णा बनसोडे, प्रतिक शिंदे (सर्व सोलापूर), चेतन बिका, तेजस जाधव, चेतन गुंडगीळ, भावेश मेश्रे (सर्व पुणे), रमेश वसावे, भरत वसावे, श्रीशंभू पेठे (धाराशिव), ओम पाटील (सांगली), रोहित गावित (नंदूरबार), हर्ष कामटेकर (मुंबई). प्रताप शेलार (प्रशिक्षक, ठाणे), संतोष कर्नाळे (सहाय्यक, सांगली), राजेश सोनावणे (व्यवस्थापक, नंदूरबार).

**मुली गट :** दिपाली राठोड (कर्णधार, ठाणे), अश्विनी शिंदे, सुहानी धोत्रे, संध्या सुरवसे, प्रणाली काळे (सर्व धाराशिव), सानिका चाफे, प्रतिक्षा बाराजदार, नयन काळे (सर्व सांगली), दिव्या गायकवाड, सान्वी तळवडेकर, तेजस्वी पाटेकर (सर्व ठाणे), पूर्वा वाघ (पुणे), सादिया मुल्ला (सोलापूर), साक्षी पारसेकर (मु. उपनगर), आर्या डोर्लेकर (रत्नागिरी). श्रीकांत गायकवाड (प्रशिक्षक, मुंबई), सुप्रिया गाढवे (सहाय्यक, धाराशिव), नंदिनी धुमाळ (व्यवस्थापिका, मुंबई).


## दुखवटा

### निर्मला तांडेल



**उरण** : तालुक्यातील करळ येथील निर्मला वसंत तांडेल (वय ५५) यांचे रविवारी (दि. २४) निधन झाले. निर्मला तांडेल या करळ ग्रामपंचायतीमध्ये दोन वेळा सदस्य म्हणून निवडून आल्या आहेत. त्यांच्या पश्चात पती, दोन मुले असा परिवार आहे. त्यांचा दशक्रिया विधी २ जानेवारी २०२४ रोजी श्री क्षेत्र नाशिक येथे तर उत्तरकार्य विधी ५ जानेवारी २०२४ रोजी त्यांच्या राहत्या घरी करळ येथे होणार आहे.

### निखिल ठाकूर



**उरण** : तालुक्यातील भेंडखळ येथील निखिल दीपक ठाकूर (वय ३३) यांचे गुरुवारी (दि. २१) अपघाती निधन झाले. भेंडखळ ग्रामपंचायतीचे उपसरपंच दिपक ठाकूर, माजी सरपंच संध्या ठाकूर यांचे ते पुत्र होते. त्यांच्या पश्चात आई, वडील, पत्नी, एक मुलगा, एक मुलगी असा परिवार आहे. निखिल ठाकूर यांचा दशक्रिया विधी ३० डिसेंबर रोजी नाना नानी पार्क खोपटे येथे तर उत्तरकार्य विधी २ जानेवारी २०२४ रोजी त्यांच्या राहत्या घरी भेंडखळला येथे होणार आहे.

### संदीप काटकर



**मोहोपाडा** : येथील संदीप नारायण काटकर (वय ५५) यांचे मुलाच्या मृत्यूमुळे धक्का बसल्याने हृविकाराचा झटका येऊन निधन झाले. संदीप काटकर यांच्या मुलाचा काही दिवसांपूर्वी शस्त्रक्रियेदरम्यान मृत्यू झाला. या घटनेमुळे वडील संदीप काटकर यांनी मोठा धसका घेतला. १९ डिसेंबर रोजी सकाळी त्यांना हृदयविकाराचा तीव्र झटका आल्याने मृत्यू झाला. त्यांच्या पश्चात त्यांचे वडील, पत्नी, मुलगी असा परिवार आहे.

# पनवेलमध्ये वधू-वर मेळावा

## लोकनेते रामशेठ ठाकूर यांच्याकडून शुभेच्छा





**पनवेल : रामप्रहर वृत्त**

पनवेल-उरण आगरी समाज मंडळाच्या वतीने वधू-वर मेळाव्याचे आयोजन शहरातील महात्मा ज्योतिबा फुले सभागृहात करण्यात आले होते. याचे माजी खासदार लोकनेते रामशेठ ठाकूर यांच्या हस्ते उद्घाटन झाले.

आगरी समाजातील विवाहयोग्य आणि विवाहोत्सुक मुलामुलींसाठी पनवेल-उरण आगरी समाज मंडळाच्या वतीने मंडळाचे अध्यक्ष अतुल पाटील यांच्या अध्यक्षतेखाली वधू-वर मेळावा आयोजित करण्यात आला होता. लोकनेते रामशेठ ठाकूर यांनी आपले मनोगत व्यक्त करीत उपस्थितांना आयुष्याच्या भावी वाटचालीसाठी शुभेच्छा दिल्या.



या वेळी नवी मुंबई आंतरराष्ट्रीय विमानतळ समितीचे अध्यक्ष दशरथ पाटील, पनवेल-उरण आगरी समाज मंडळाचे अध्यक्ष अतुल पाटील, माजी नगराध्यक्ष जे. एम. म्हात्रे, माजी नगरसेवक जगदीश गायकर, मंडळाचे उपाध्यक्ष अनंतराव पाटील, सचिव बी. पी. म्हात्रे, कोषाध्यक्ष विजय गायकर यांच्यासह इतर मान्यवर आणि पदाधिकारी उपस्थित होते.

### श्री. रामशेठ ठाकूर सामाजिक विकास मंडळाची नवी कार्यकारिणी जाहीर

# आमदार प्रशांत ठाकूर यांची अध्यक्षपदी फेरनिवड

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

श्री. रामशेठ ठाकूर सामाजिक विकास मंडळ वार्षिक सर्वसाधारण सभा उलवे नोड येथील रामशेठ ठाकूर स्पोर्ट्स कॉम्प्लेक्समध्ये सोमवारी (दि.२३) झाली. या सभेत मंडळाची नवीन कार्यकारिणी निवड करण्यात आली. यामध्ये अध्यक्षपदी आमदार प्रशांत ठाकूर यांची फेरनिवड करण्यात आली आहे.

नवीन कार्यकारिणी निवडण्यासाठी श्री. रामशेठ ठाकूर सामाजिक विकास मंडळ वार्षिक सर्वसाधारण सभा उलवे नोड येथील रामशेठ ठाकूर स्पोर्ट्स कॉम्प्लेक्समध्ये झाली. सभेस मंडळाचे संस्थापक माजी खासदार लोकनेते रामशेठ ठाकूर, ज्येष्ठ नेते वाय. टी. देशमुख, विश्वनाथ कोळी, अनंता ठाकूर, पी. के. ठाकूर, व्ही. के. ठाकूर, अजय भगत, प्रकाश भगत, रघुनाथ देशमुख, कमलाकर देशमुख, जयवंत देशमुख, अभिजीत जाधव, रवींद्र भगत यांच्यासह इतर सदस्य उपस्थित होते. सभेच्या वेळी डॉ. एस. टी. गडदे यांनी निवडणूक अधिकारी म्हणून काम पाहिले.

नवीन कार्यकारिणीमध्ये अध्यक्षपदी आमदार प्रशांत ठाकूर, उपाध्यक्षपदी अरुणशेठ भगत, सेक्रेटरीपदी परेश ठाकूर, खजिनदारपदी हरिभाऊ पाटील, कार्यकारी मंडळ सदस्य म्हणून सागर ठाकूर, वसंत पाटील, अनिल भगत, अनिल देशमुख व संजय भगत यांची निवड करण्यात आली आहे. सर्व नवनियुक्त पदाधिकाऱ्यांचे उपस्थित मान्यवरांनी अभिनंदन केले आणि पुढील वाटचालीसाठी शुभेच्छा दिल्या.




# उरण, पनवेलमधील ३६ विद्यार्थ्यांची खगोलशास्त्र कॅम्पसाठी निवड

**उरण : प्रतिनिधी, वार्ताहर**

प्रथम एज्युकेशन फाउंडेशन अंतर्गत चालणाऱ्या युथ नेट प्रोग्रॅममध्ये कौशल्य कल्पकता कार्यक्रमांतर्गत देशातील विविध जिल्ह्यातील १० ते १८ वयोगटातील विद्यार्थी सहभागी झाले होते. यात चांद्रयान ३साठी रायगड जिल्ह्यातून मेसेज टू मूनसाठी १४३ विद्यार्थ्यांचे कल्पक संदेश आणि फोटो पाठविण्यात आले होते. त्यापैकी उरण व पनवेल तालुक्यातील ३६ विद्यार्थ्यांची या प्रोजेक्टसाठी निवड झाली होती. या विद्यार्थ्यांना पुढील मार्गदर्शनासाठी नेहरू सायन्स सेंटर मुंबई येथे कॅम्पमधून खगलशास्त्रीय तज्ज्ञांच्या मार्गदर्शनाखाली दोन दिवस प्रशिक्षण देण्यात आले.




उरण तालुक्यातील राजिप शाळा मोठीजुई, आवरे तर पनवेल तालुक्यातील सुएसो माध्यमिक विद्यालय चिंध्रण, राजिप शाळा सुकापूर, श्री छत्रपती शिवाजी महाराज विद्यालय वावंजे आदी शाळांचे विद्यार्थी सहभागी झाले होते. निवड झालेल्या विद्यार्थ्यांना प्रथम एज्युकेशन फाउंडेशनच्या वतीने नेहरू सायन्स सेंटर मुंबई येथे दाखल करण्यात आले होते. त्यांना खगोलशास्त्राबद्दल संपूर्ण माहिती देण्यात आली. त्यांच्याकडून काही मॉडेल्स बनवून घेण्यात आल्या. त्यामध्ये तारामंडळ, सूर्यमाला, सन इज वन, कंपासच्या साह्याने दिशा कशा शोधल्या जातात. त्याचबरोबर ग्रहांबद्दल माहिती देण्यात आली. त्यानंतर कॅम्प पूर्ण केलेल्या सहभागी सर्व विद्यार्थ्यांना नेहरू सायन्स सेंटरतर्फे प्रशस्तीपत्र देण्यात आले.

# प्रजापती समाज विकास मंडळाचे संमेलन

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

प्रजापती समाज विकास मंडळ नॅशनल सोशल ऑर्गनायझेशन एनजीओची पनवेल येथे बैठक संस्थेचे राष्ट्रीय अध्यक्ष सी. पी. प्रजापती यांच्या अध्यक्षतेखाली झाली. बैठकीत संस्थेचे १९वे वार्षिक संमेलन ७ जानेवारी २०२४ रोजी नवीन पनवेल येथे घेण्याचे एकमताने ठरले.

संमेलनाचे प्रमुख पाहुणे खासदार श्रीरंग आप्पा बारणे, प्रमुख बालरोग विभाग एमजीएम रुग्णालय कामोठे डॉ. विजय एन. कमले, संपादक दैनिक लोकमंथन अशोक विठ्ठल सोनवणे, हरिराम आर. प्रजापती, सिक्मी प्रसाद प्रजापती, प्रा. रामजन्म प्रजापती, दिनेश प्रजापती, माजी शास्त्रज्ञ आणि लालचंद बी. प्रजापती, राम सुरत प्रजापती, ओएनजीसी माजी जीएम डॉ. भगवानदास प्रजापती आणि माजी जीएम माझगाव पोस्टल लिमिटेड के. एन. वर्मा उपस्थित राहणार आहेत.



समाजातील लोकांनी जास्तीत जास्त संख्येने उपस्थित राहून संमेलन यशस्वी करावे, असे आवाहन संस्थेतर्फे करण्यात आले आहे.

बैठकीला राष्ट्रीय मुख्य सरचिटणीस विनोदकुमार प्रजापती, नवीन मुंबई अध्यक्ष इंद्रजित प्रजापती, नवीन पनवेल अध्यक्ष गोवर्धन प्रजापती, इंदर प्रजापती, पनवेल शहराध्यक्ष राजेंद्र प्रजापती, अध्यक्ष ठाणे गजेंद्र प्रजापती, उत्तर प्रदेश प्रतिनिधी शिवकुमार प्रजापती, रवींद प्रजापती यांच्यासह इतर सदस्य उपस्थित होते.

# पनवेलमध्ये नवमतदारांना कार्डचे वाटप



**पनवेल : रामप्रहर वृत्त**

पनवेल महापालिका हद्दीतील प्रभाग क्रमांक १७मधील शिवाजी नगर वसाहत, लोकमान्य नगर आणि नवनाथ नगर वसाहत येथील १८ वर्षे पूर्ण झालेल्या मुलामुलींची मतदार नोंदणी भाजपच्या वतीने करण्यात आली होती. त्यांना नवीन मतदारकार्डचे वाटप लोकमान्य नगर रेल्वेस्टेशन रोड येथे भाजप उत्तर रायगड जिल्हा सरचिटणीस तथा माजी नगरसेवक ॲड. प्रकाश बिनेदार यांच्या मार्गदर्शनाखाली उत्तर रायगड जिल्हा झोपडपट्टी सेल संयोजक राहुल वाहुळकर, अनुसूचित जाती मोर्चा पनवेल शहराध्यक्ष रावसाहेब खरात यांच्या पाठपुराव्याने करण्यात आले.

या वेळी अनुसूचित जाती मोर्चा माजी शहर अध्यक्ष श्याम साळवी, भाजप कार्यकर्ते दिपक वाहुळकर, आनंद जाधव, रवि रत्नपारखे, राजू धोत्रे, राजू बोदडे, सागर जाधव, करण वाहुळकर, प्रकाश बोरुडे, किरण वाहुळकर, सर्जेराव साळवे, सनी वाहुळकर, जितेंद्र राजभर, मदार नबी शेख, गणेश जाधव, सदाम शेख, विनोद बोदडे, गणेश जाधव, सनी साळवे, अनिकेत खरात उपस्थित होते.

## सोन्याच्या दागिन्यांचा अपहार केल्याप्रकरणी गुन्हा

**पनवेल : वार्ताहर**

गोठविलेले सोने किंवा भर घालून नवीन दागिने बनवून न देता फिर्यादीचा विश्वासघात करून सोन्याचा दागिन्यांचा अपहार करून फसवणूक केल्याबद्दल सोनाराविरोधात पनवेल शहर पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

फिर्यादींनी सोनारास जवळपास एक लाख दहा हजार रुपये किमतीचे सोन्याचे दागिने गोठवून त्यामध्ये भर घालून नवीन दागिने बनवून देण्यास सांगितले होते, परंतु सोनाराने विश्वासघात करून सोन्याच्या दागिन्यांचा अपहार करून फसवणूक केल्याबद्दल पनवेल शहर पोलीस ठाण्यात सोनाराविरोधात पनवेल शहर पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.





**पनवेल : भाजपचे तालुका सरचिटणीस राजेंद्र पाटील यांचे वडील व कोळखे ग्रामपंचायतीचे माजी सरपंच कै. हभप हरिश्चंद्र लक्ष्मण पाटील यांची ३०वी पुण्यातिथी आणि आई कै. अनुसया पाटील यांचा १६वा पुण्यस्मरण दिन रविवारी होता. त्यानिमित्त आमदार प्रशांत ठाकूर व आमदार महेश बालदी यांनी अभिवादन केले. या वेळी पाटील कुटुंबिय उपस्थित होते.**







**गव्हाण : शिवाजीनगर येथील श्री स.स. बाळकृष्ण महाराज अध्यात्मिक ज्ञानमंदिरात श्री. रामशेठ ठाकूर ग्रामस्थ मंडळ संयोजित, देवसागर साधक समाज (इंचगिरी सांप्रदाय) यांच्यातर्फे गुरुचरित्रामृत ग्रंथ, श्री दासबोध ग्रंथ, एकनाथ भागवत ग्रंथाचा पारायण सोहळा २४ ते २६ डिसेंबरदरम्यान आयोजित करण्यात आला आहे. स. स. बाळासाहेब महाराज, हभप आप्पा पांचाळ महाराज यांच्या हस्ते रविवारी सप्ताहाला प्रारंभ करण्यात आला. पहिल्या दिवशी संत जनाबाई भजन मंडळ विहीघर, श्री गुरुकृपा भजन मंडळ, भावभक्ती महिला भजन मंडळ खारकोपर यांनी भजनसेवा केली. या वेळी ग्रामस्थ मंडळ व माजी पंचायत समिती सदस्या रत्नप्रभा घरत यांच्यातर्फे सर्व भजनी मंडळांचे स्वागत करण्यात आले.**



**पनवेल : भाजपचे कर्नाळा बूथ अध्यक्ष जितेंद्र पाटील यांना वाढदिवसानिमित्त मावळ लोकसभा प्रमुख आमदार प्रशांत ठाकूर यांनी शुभेच्छा दिल्या. या वेळी तालुका सरचिटणीस राजेंद्र पाटील, केळवणे जिल्हा परिषद विभागीय अध्यक्ष मंगेश वाकडीकर, हर्षल तेजे उपस्थित होते.**

## संपादकीय

# कोरोनामुळे पुन्हा चिंता

चालू वर्ष सरायला आता अवघे काही दिवस उरले आहेत. मुलांना नाताळची सुटीही पडली असून जो तो पर्यटनासह थर्टी फर्स्ट आणि नववर्ष स्वागताचे बेत आखू लागला आहे. अशातच कोरोना पुन्हा एकदा आपले डोके वर काढू लागला आहे. सध्या देशात जेएन१ व्हेरियंटमुळे चिंतेचे वातावरण निर्माण झाले आहे. या पार्श्वभूमीवर सरकारने पावले उचलत आरोग्य यंत्रणेला सतर्कतेचा इशारा दिला आहे, तर नागरिकांनाही काळजी घेण्याचे आवाहन केले आहे

**कोरोनारूपी संकट पुन्हा पुन्हा मानवी जीवनात बाधा आणत आहे. चीनमधून उत्पत्ती झालेला हा विषाणू सर्वप्रथम २०२०मध्ये सर्वांना कळला आणि त्याने हा हा म्हणता अवघ्या जगाला आपल्या कवेत घेतले. संसर्गजन्य असलेल्या कोविड-१९ची तीव्रता इतकी होती की जगभरातील असंख्य लोक बळी पडले. अनेकांचे आयुष्य उद्ध्वस्त झाले, तर कित्येकांचे संसार उघड्यावर आले. अक्षरश: होत्याचे नव्हते झाले. सुमारे दोन वर्ष त्याचा परिणाम जाणवत राहिला. त्यानंतर तो वेगवेगळ्या व्हेरिएंट अर्थात उत्प्रेरकांच्या माध्यमातून अधूनमधून हातपाय पसरत असतो. सध्या देशात कोरोनाचा नवा व्हेरियंट जेएन१ धुमाकूळ घालतोय. केरळ, कर्नाटक, तामिळनाडू, महाराष्ट्र गोवा या राज्यांमध्ये प्रादुर्भाव वाढत असल्याने या राज्यांमध्ये विशेष खबरदारी घेतली जात आहे. केरळमध्ये आंतरराष्ट्रीय प्रवास करणाऱ्याची संख्या जास्त असल्याने तिथे जास्त प्रादूर्भाव आहे. महाराष्ट्रातही त्याचा शिरकाव झाला असून कृषीमंत्री धनंजय मुंडे कोविड पॉझिटिव्ह आढळले आहेत. नवीन व्हेरियंट हा कोविड-१९ विषाणूच्या ओमायक्रॉन व्हेरिएंटचा सब-व्हेरिएंटच आहे. भारतात मोठ्या लोकसंख्येमध्ये दिवसेंदिवस कोरोनाचा वाढता आलेख पाहायला मिळत आहे. या पार्श्वभूमीवर केंद्र सरकार आणि आरोग्य यंत्रणा सतर्क झाल्या आहेत. देशाने याआधीदेखील पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या नेतृत्वाखाली महाभयंकर कोरोना संकटाचा धीरोदात्तपणे सामना केला आहे. एवढेच नव्हे; तर काही देशांमध्ये कोरोनावरील लसींचा तुटवडा असताना तेथे भारताने लसी पुरवून अनेकांचे प्राण वाचवले. याबद्दल संपूर्ण जगात आपली वाहव्वा झाली. मागील अनुभवाच्या आधारे आताही यंत्रणा सज्ज झाल्या आहेत. त्यामुळे घाबरण्याचे कारण नाही, पण नागरिकांनी खबरदारी घेणे गरजेचे आहे. सर्दी, खोकला, ताप यासारखी लक्षणे दिसल्यास त्यांनी तत्काळ तपासणी करून घ्यावी. नाताळची मुलांना सुटी असल्याने अनेक कुटुंब पर्यटनासाठी निघाली आहेत. पुढे वर्षाअखेर व नववर्षारंभ असल्याने आतापासूनच बेत आखले जाऊ लागले आहेत. यातून कोरोना वाढण्यास मदत होऊ शकते. ते लक्षात घेता गर्दीच्या ठिकाणी जाणे टाळावे तसेच मास्कचा वापर करणे गरजेचे आहे, जेणेकरून स्वत:सह परिवाराचा बचाव होईल आणि इतरांनाही त्रास होणार नाही. कोरोना हा संसर्गजन्य असल्याने त्याचा प्रसार वेगाने होतो. त्यामुळे साहजिकच रुग्णसंख्येने वाढ होते, पण घाबरून जाण्याचे कारण नाही. आपण त्यावर मात करू शकतो हे आपण याआधीही अनुभवले आहे. त्याचप्रमाणे सोशल मीडिया तसेच प्रसारमाध्यमांनी नव्या व्हेरिएंटसंदर्भात चुकीच्या बातम्या प्रसारित होणार नाहीत याची दक्षता घ्यावी, जेणेकरून लोकांमध्ये अफवा पसरणार नाही, संभ्रम वा घबराटही निर्माण होणार नाही. प्रत्येकाने निर्धार केल्यास पुन्हा एकदा आपण कोरोनाला निश्चितपणे हरवू शकतो.**

# निसर्गरम्य कर्जत पर्यटकांचे आवडते ठिकाण







**खबरबात**
**विजय मांडे**

कर्जत तालुका म्हणजे पर्यटकांना पर्वणीच आहे. जगप्रसिद्ध माथेरान हे थंड हवेचे ठिकाण, कोंढाणे येथील लेणी, ढाक, पेठ अशी अनेक ठिकाणे मुंबईकरांचे लक्ष वेधून घेतात. या तालुक्यात अनेक फार्म हाऊस आणि रिसॉर्ट आहेत. त्यामुळे उन्हाळ्यातही येथे येण्यासाठी अनेक जण उत्सुक असतात, तर पावसाळ्यात या तालुक्यात अगदी कुठेही गेलात तरी धबधबे दिसतात. आता वर्षाअखेरीस 'थर्टी फर्स्ट' मोठ्या प्रमाणात साजरा करण्यात येतो. त्यासाठी मुंबई, पुणेच नव्हे; तर राज्यातून परराज्यातून हौशी, शौकीन कर्जतला पसंती देतात.

यंदाच्या थर्टी फर्स्टसाठी माथेरानसह तालुक्यातील रिसॉर्टची बुकिंग फुल्ल झाली आहे. दोन-तीन महिन्यांपूर्वीच हौशी पर्यटकांनी ही बुकिंग केली असल्याने आयत्या वेळी येणाऱ्यांना परत फिरावे लागत आहे. माथेरानमध्ये मजा करण्यासाठी अचानकपणे निघालेले पुण्याकडील येणाऱ्यांना खोपोली, कर्जत किंवा नेरळला मुक्काम करावा लागतो. मग दुसऱ्या दिवशी माथेरानमध्ये रूमची व्यवस्था झाली तर मग ते माथेरानकडे कूच करतात; अन्यथा त्यांना कर्जतच्या मिळेल त्या रिसॉर्टवर असेल त्या दरात रूम बुक करून दुधाची तहान ताकावर भागवण्याशिवाय पर्याय नसतो. माथेरानचे वाहनतळसुद्धा फुल्ल असते. त्यामुळे पर्यटक आपली वाहने घाट रस्त्यावर कडेला उभी करतात. या प्रकाराने वाहतूक कोंडी होत असते.

माथेरान व कर्जत नगरपालिकेची निवडणूक डिसेंबर व जानेवारीत असते त्यामुळे कार्यकर्त्यांची मोठी चंगळ असते. माथेरानची निवडणूक डिसेंबरअखेर असल्याने आयताच थर्टी फर्स्ट आलेला असतो. त्यामुळे उमेदवारांच्या पैशांवर थर्टी फर्स्ट साजरा करण्याची संधी मिळते तसेच कर्जत नगरपालिकेची निवडणूक जानेवारी महिन्याच्या मध्यावर असते. त्यामुळे प्रचारादरम्यान थर्टी फर्स्ट येतो आणि कार्यकर्त्यांना निमित्तच मिळते. प्रचाराला जाऊन दमून आल्यानंतरसुद्धा अगदी नव्या दमाने थर्टी फर्स्ट साजरा करण्यात येतो.

कर्जत तालुक्यात विकेण्डला यायचे म्हणजे अनेकांच्या पोटात गोळा येतो. त्याचे कारण कर्जतच्या प्रवेशद्वारावर म्हणजे चारफाट्यावर होणारी वाहतूक कोंडी. ही वाहतूक कोंडी इतकी होते की, दीड-दोन किलोमीटर अंतरासाठी एक दीड तास लागतो. त्यामुळे पर्यटकांबरोबरच स्थानिकांनाही त्याचा दर आठवड्याला फटका बसतो. एखाद्या रुग्णाला रुग्णवाहिकेतून नेताना त्याचा मृत्यू या वाहतूक कोंडीमुळे होऊ शकतो अशी परिस्थिती उदभवते. या वाहतूक कोंडीमुळे अनेकांच्या लांब पल्ल्याच्या गाड्या, प्रसंगी विमानेही चुकली आहेत.

कर्जत तालुक्यात बाराही महिने पर्यटकांची गर्दी असते. वर्षासहलीची टूम मध्यमवर्गीय मंडळींनी मागील दशकात सुरु केली. त्या वेळी लोणावळ्यात भुशी धरण आणि माळशेज घाट हीच त्यांची डेस्टिनेशन होती, मात्र कर्जत तालुक्यात असंख्य धबधबे असल्याने व लोकलने कर्जतला येणे स्वस्त व सुरक्षित असल्याने पर्यटक कर्जतच्या धबधब्यांवर येऊन वर्षासहलीचा आनंद घेऊ लागली. उपनगरीय लोकलमधून सहज लक्ष जाणारा आषाणे येथील धबधबा पुढे वर्षासहलप्रेमींचा सर्वाधिक आवडता धबधबा ठरला आहे. पर्यटकांची सर्वाधिक पसंती लाभलेल्या धबधब्यावर येण्यासाठी मुंबईमधून टूर आयोजित करण्यापर्यंत आषाणे धबधबा आपल्याकडे सर्वांना आकर्षित करण्यात यशस्वी ठरला आहे, मात्र अपघात होऊ लागल्याने धबधबे व धरणांवर जाण्यासाठी शासनाने बंदी घातल्यामुळे पर्यटकांचा हिरमोड होत असतो.

कर्जत तालुक्यात माथेरान हे जगप्रसिद्ध पर्यटनस्थळ आहे. त्याचबरोबर रायगड आणि पुणे जिल्ह्याच्या सीमेवर ढाक हे डोंगरावरील पठारावर आहे. माथेरानपेक्षा काही फूट उंच असलेले हे ठिकाण म्हणजे मिनी माथेरान म्हणून प्रसिद्धीस येऊ शकते. ढाक हे मिनी माथेरान म्हणून विकसित व्हावे यासाठी स्थानिकांबरोबरच काही मुंबईकरांनीही काही वर्षांपूर्वी प्रयत्न केला होता, मात्र हे पर्यटन स्थळ विकसित झाले नाही कटू सत्य आहे.

ढाक हे मिनी माथेरान म्हणून विकसित झाल्यास पुणे जिल्ह्यातूनसुद्धा तेथे यायला सोपा मार्ग आहे तसेच मुंबईकरांना कर्जतला येऊन अवघ्या सहा किलोमीटर अंतरावर येऊन या स्थळाकडे जात येण्यासारखे आहे. गौरकामत व वदप या गावांपासून ढाकपर्यंत घाट रस्ता केल्यास हे पर्यटनस्थळ विकसित होऊ शकते. म्हणजे एरव्ही पर्यटनाची आणि थर्टी फर्स्टची मजा येथेही घ्यायला मुंबई, पुणेकरांना आवडेल यात शंका नाही.

# ख्रिस्ती सण नाताळ

नाताळ किंवा ख्रिसमस हा एक ख्रिस्ती सण आहे. हा सण दरवर्षी २५ डिसेंबर रोजी साजरा केला जातो. या दिवशी ख्रिस्ती बांधवांचे लाडके प्रभू येशू यांचा जन्म झाला होता. काही ठिकाणी हा सण ६, ७ किंव्हा १९ जानेवारीला एपिफानी म्हणून साजरा करतात. हा सण १२ दिवसांचा असून ख्रिसमस्टाईड पर्वाची सुरुवात होते. जगाभरात हा सण साजरा होतो. काही ठिकाणी मध्यरात्री, तर काही ठिकाणी संध्याकाळी हा सण साजरा केला जातो.

नाताळ हा शब्द नातूस म्हणजे जन्म या लॅटिन शब्दापासून बनला आहे. या दिवसाला इंग्रजी भाषेत ख्रिसमस म्हणतात. ख्रिसमस म्हणजे ख्रिस्तमहायज्ञ (मिस्सा). ख्रिस्त महागुरुंना ख्रिस्तमसच्या दिवशी तीन मिस्सा अर्पण करण्याची परवानगी दिली गेली. ख्रिस्ताच्या जन्मघटकेच्या स्मरणार्थ पहिला मिस्सा मध्यरात्री अर्पण केला जाते. ख्रिस्ताचा जन्म मध्यरात्री झाला अशी मान्यता आहे. दुसरा मिस्सा पहाटे व तिसरा मिस्सा दिवसात अर्पण केला जात असे.

मध्यरात्रीचा मिस्सा बेथलहेम येथे अर्पण केला जाते. हे इस्राईल देशातील एक छोटंसं गाव आहे. याच गावात ख्रिस्तांचा (प्रभू येशू) जन्म झाला. या दिवशी इथून लोकं रात्रीच्या समयी मिरवणूक काढून जेरूसेलम गावी पहाटेच्या सुमारास पोहचतात. तिथे दुसरा मिस्सा अर्पण केला जातो. नंतर दिवसा महामंदिरात सर्व ख्रिस्ती बांधव एकत्र होतात त्या वेळी तिसरा मिस्सा अर्पण होत असे.

नाताळ सणामध्ये भेटवस्तू देण्याची प्रथा अत्यंत महत्त्वाची आहे. विशेषतः लहान मुले या सणाची खूप आतुरतेने वाट बघतात. सांताक्लॉज येऊन मुलांना भेटवस्तू आणि खाऊ देतात अशी समज असते. महाराष्ट्रातील ख्रिस्ती लोक दिवाळीप्रमाणे या दिवशी करंज्या व अन्य खाद्यपदार्थांचे एकमेकांस आदान-प्रदान करतात. लहान मुलांना सांताक्लॉजच्या वेषात येऊन भेटवस्तू देतात.

या दिवशी ख्रिश्चन अनुयायी एकमेकांना विविध भेटवस्तू, शुभेच्छा पत्रे देऊन परस्पर अभिनंदन करतात. आपल्या घरात रोषणाई करतात. घराला सजवतात. ख्रिसमस वृक्ष सजावट करतात. या सणात चॉकलेट केक बनवले जाते. हा सण लहान थोर सर्व उत्साहाने, आनंदाने साजरा करतात. हा सण सर्वांना एकत्र आणतो. (साभार : वेबदुनिया)



## बदलते तंत्रज्ञान

# फेसबुक, इन्स्टाग्रामवर आता मिळणार नाही 'हे' फीचर



मेटा लवकरच आपली एक खास सर्व्हिस बंद करणार आहे. कंपनीने याबाबत अधिकृत घोषणा केली आहे. कंपनीने क्रॉस प्लॅटफॉर्म मेसेजिंग खूप पूर्वी लॉन्च केलं होतं. त्याच्या मदतीने, युजर्स फेसबुक आणि इन्स्टाग्रामवर दुसऱ्या युजर्सच्या मेसेजचं उत्तर क्रॉस प्लॅटफॉर्मवर देऊ शकतात.

कंपनीने तीन वर्षांपूर्वी ही सर्व्हिस सुरू केली होती. कंपनीने आता हे फीचर बंद करण्याचा महत्त्वाचा निर्णय घेतला आहे. याचा अर्थ तुम्ही फेसबुकवर येणाऱ्या मेसेजला फक्त फेसबुक मेसेंजरद्वारेच उत्तर देऊ शकाल.

इन्स्टाग्रामच्या बाबतीतही असेच आहे. येथे देखील तुम्हाला या प्लॅटफॉर्मवर इन्स्टाग्रामवर येणाऱ्या ऊच् ला उत्तर द्यावं लागेल, मात्र कंपनीने हे फीचर बंद करण्याचे कारण दिलेलं नाही.


**कधी बंद होणार हे फीचर?**

मेसेंजरवर एंड टू एंड एन्क्रिप्शन फीचर जोडले जाणार असताना मेटाने हा निर्णय घेतला आहे. या वर्षाच्या अखेरीस फेसबुक मेसेंजरवर हे फीचर येऊ शकतं असा अंदाज आहे. इन्स्टाग्राम सपोर्ट पेजवर कंपनीने माहिती दिली आहे की, डिसेंबरच्या मध्यापासून क्रॉस एप कम्युनिकेशन चॅट्स बंद केले जातील.

कंपनीच्या म्हणण्यानुसार हे फीचर डिसेबल केल्यानंतर कोणत्याही प्लॅटफॉर्मवरील युजर्स इतर प्लॅटफॉर्मवरील मेसेजना प्रतिसाद देऊ शकणार नाहीत, मात्र ते मेसेज वाचू शकतात. याशिवाय चॅट हिस्ट्रीदेखील मिळेल. हे फीचर बंद केल्यानंतर तुम्ही इन्स्टाग्राम वापरून फेसबुक युजर्सशी चॅट करू शकणार नाही.

फेसबुकच्या बाबतीतही असेच घडेल. एक्टिव्हिटी स्टेटस सेटिंग फीचरच्या मदतीने जे फेसबुक युजर्स तुम्हाला ऑनलाइन पाहू शकत होते किंवा तुमचे मेसेज पाहू शकत होते, त्यांनाही आता हे फीचर मिळणार नाहीत. दोन्ही प्लॅटफॉर्मवर चॅटिंग सुरू ठेवण्यासाठी तुम्हाला नवीन चॅट सुरू करावे लागेल.

# माजी पंतप्रधान स्व. अटलबिहारी वाजपेयी



**निमित्त**

अजातशत्रू असा नावलौकिक असलेले अटलबिहारी वाजपेयी हे राजकीय वचनबद्धतेसाठी ओळखले जातात. १३ ऑक्टोबर १९९९ रोजी त्यांनी सलग दुसऱ्यांदा भाजपप्रणित राष्ट्रीय लोकशाही आघाडी सरकारचे प्रमुख म्हणून पंतप्रधानपदाची सूत्रे स्वीकारली. १९९६ साली थोड्या कालावधीसाठी त्यांनी पंतप्रधान म्हणून काम पाहिले होते. पंडित नेहरुनंतर सलग दुसऱ्यांदा जनादेश मिळवणारे ते पहिले पंतप्रधान ठरले.

ज्येष्ठ संसदपटू असलेले अटलबिहारी वाजपेयी राजकारणात चार दशक सक्रिय होते. वाजपेयी नऊ वेळा लोकसभेवर, तर दोनवेळा राज्यसभेवर निवडून आले होते हाही एक प्रकारचा विक्रमच आहे. स्वातंत्र्योत्तर काळात भारताचे अंतर्गत व परकीय धोरणास आकार देण्यात एक पंतप्रधान, परराष्ट्रमंत्री, विविध स्थायी समित्यांचे अध्यक्ष व एक विरोधी पक्षनेते म्हणून त्यांनी समर्थपणे भूमिका बजावली.

ब्रिटीश सत्तेला भारतातून पायउतार करण्यात महत्त्वाच्या ठरलेल्या १९४२मधील भारत छोडो चळवळीमध्ये सहभागी होऊन विद्यार्थीदशेतच वाजपेयी यांनी राष्ट्रवादी राजकारणाचे धडे गिरवले. राज्यशास्त्र व कायद्याचे विद्यार्थी असलेल्या वाजपेयींना शालेय काळातच परकीय व्यवहारामध्ये रूची निर्माण झाली होती. त्यांनी ही आवड पुढे अनेक वर्षे जोपासली व विविध द्विपक्षीय व बहुपक्षीय व्यासपीठांवर भारताचे प्रतिनिधित्व करताना त्यांनी या कौशल्याचा उपयोग केला.

वाजपेयी यांनी एक पत्रकार म्हणून आपल्या कारकीर्दीची सुरुवात केली, परंतु अल्पावधीतच म्हणजेच १९५१ साली भारतीय जनसंघात प्रवेश करण्यासाठी त्यांनी पत्रकारिता सोडली. राष्ट्रीय लोकशाही आघाडीतील महत्त्वाचा घटक असलेला भारतीय जनता पक्ष हा आधी जनसंघ म्हणून ओळखला जात होता. समीक्षकांकडून प्रशंसा मिळवलेले वाजपेयी एक ख्यातनाम कवी होते. शिवाय आपल्या व्यस्त कामातून वेळ काढून ते संगीत व पाककलेतही विशेष रस घेत.

२५ डिसेंबर १९२४ साली तत्कालीन ग्वालेर संस्थानातील (आताच्या मध्य प्रदेश राज्यात आहे) एका प्राथमिक शिक्षकाच्या घरात अटलबिहारी वाजपेयी यांचा जन्म झाला. त्यांचा सामाजिक जीवनातील उदय हा भारतीय लोकशाही व त्यांच्या कुशाग्र राजकीय बुद्धिमत्तेचा गौरव आहे. उदारमतवादी जागतिक दृष्टीकोन व लोकशाही तत्वांशी असलेली बांधिलकी यामुळे जनसामान्यांना त्यांच्याबद्दल नेहमीच आदर राहिला.

महिला सबलीकरण व सामाजिक समानतेचे खंबीर समर्थक असलेले अटलबिहारी वाजपेयी भारताला आंतरराष्ट्रीय पातळीवर सर्व देशांमध्ये एक दूरदर्शी, विकसित आणि मजबूत राष्ट्र म्हणून बघू इच्छित होत. पाच हजार वर्षांची ऐतिहासिक संस्कृती लाभलेल्या व आगामी एक हजार वर्षांमध्ये येणारी आव्हाने पेलण्यास तयार असलेल्या भारत देशाचे ते प्रतिनिधित्व करीत होते.

भारताप्रती असलेले त्यांचे निस्वार्थ समर्पण व पन्नास वर्षांहून अधिक काळ देशासाठी दिलेल्या निस्पृह सेवेबद्दल त्यांना भारतातील दुसरा सर्वोच्च नागरी सन्मान असलेला पद्मविभूषण पुरस्कार प्रदान करण्यात आला. १९९४ साली उत्कृष्ट संसदपटूचा पुरस्कारही त्यांना मिळाला आहे. एका उल्लेखानुसार अटलबिहारी वाजपेयी नावाप्रमाणेच एक ज्येष्ठ भारतीय नेते, निष्णात राजकारणी, निस्पृह सामाजिक कार्यकर्ते, बलवान वक्ते, कवी, साहित्यिक, पत्रकार व खऱ्या अर्थाने बहुआयामी व्यक्तिमत्त्व होते. जनसामान्यांच्या आशा-आकांक्षा वाजपेयी यांनी पूर्ण केल्या. त्यांनी केलेल्या कार्यातून त्यांची राष्ट्राप्रती असलेली निष्ठा प्रतीत होते. (साभार : इंटरनेट)


**क्लिक...क्लिक...!**



मुरुड : सलग सुट्ट्यांमुळे फिरण्यास आलेले पर्यटक जंजिरा किल्ला पाहण्यासाठी शिडाच्या बोटींमधून सैर करतात. (छाया : सुधीर नाझरे)

## आरोग्य प्रहर

# हृदयविकारासाठी थंडीत हे ड्रायफ्रुट्स लाभदायक



हिवाळ्यात हार्ट अटॅकचे प्रमाण जादा असते. त्यामुळे हिवाळ्यातील आपला आहार वेगळा असायला हवा. आपल्याकडील ड्रायफ्रुट्समध्ये अनेक पोषकतत्व असल्याने हिवाळ्यात त्यांचा वापर करायला हवा. अक्रोड, बदाम, काजू आणि पिस्ता यांचे जर योग्य प्रमाणात आहारात वापर केला तर हृदयाचे आरोग्य सुधारायला मदत होते, मात्र अधिक प्रमाणात ड्रायफ्रुट्स धोकादायक ठरू शकतात. तज्ज्ञांच्या मते बदाम, अक्रोड, काजू, मनुके, पिस्ता असे मिळून रोज ३० ग्रॅमपेक्षा जास्त खाऊ नये. चला पाहूयात याचा हृदयावर कसा परिणाम होतो.

**मनुका** – मनुकांमध्ये मॅग्निशियम, पोटॅशियम, आयर्न, झिंकसारखे महत्त्वपूर्ण मिनरल्स असतात. हृदयाचे कार्य चांगले राखण्यास त्यामुळे मदत मिळते. यात फायबर आणि अँटीऑक्सीडेंट्सदेखील असतात. त्यामुळे कोलेस्ट्रोल कमी होते. थंडीत मनुके खाल्ल्याने ब्लड प्रेशर आणि कोलेस्ट्रोल कंट्रोलमध्ये राहते. त्यामुळे हृदयरोगाचा धोका कमी होतो.

**अक्रोड** – अक्रोडमध्ये हृदयासाठी खूपच फायदेशीर घटक असतात. अक्रोडमध्ये मोनोअनसेचुरेटेड आणि पॉलीअनसेचुरेटेड फॅटी ॲसिडसारखे हेल्थी फॅट्स असतात. यामुळे रक्तातील कोलेस्ट्रोल कमी होते. यात फायबर आणि विटामिन्स ईदेखील आढळते. त्यामुळे हृदयरोगापासून बचाव होतो.

**बदाम** – बदामात ओमेगा-३ फॅटी एसिड असते. हे हृदयासाठी खूपच फायदेशीर आहे. ओमेगा-३ फॅटी एसिड रक्तातील एकूण कोलेस्ट्रोल आणि ट्रायग्लिसराईडच्या प्रमाणास कमी करण्यास मदत करते. याशिवाय रक्त पातळ बनविते. तसेच हृदयाची स्पंदने नियंत्रित करण्यात मदत करते.

**पिस्ता** – रस्त्यात भरपूर प्रमाणात अँटीऑक्सीडेंट्स आढळते, जे हृदयासाठी आवश्यक असते. पिस्त्यातील अँटीऑक्सीडेंट्स फ्री रेडीकल्सला नष्ट करायला मदत करते. हे ऑक्सीडेटिव्ह तणावाला कारण बनतात. हे धमन्यांचा संकुचित होण्यास रोकते तसेच कोलेस्ट्रोल जमण्यास रोकण्याची ताकद त्यात असते. पिस्ता खाल्ल्याने हार्ट अटॅक आणि स्ट्रोक रोखण्यास मदत मिळते.

# श्रीवर्धन मतदारसंघात १२० कोटींची तरतूद

## खासदार सुनील तटकरे यांची पत्रकार परिषदेत माहिती

**रोहे : प्रतिनिधी**

श्रीवर्धन विधानसभा मतदारसंघातील कामांसाठी राज्य शासनाच्या पुरवणी अर्थसंकल्पात १२० कोटींची तरतूद करण्यात आली आहे. यांसह धाटाव औद्योगिक क्षेत्रालगत असलेल्या गावांतर्गत रस्त्यांचे सिमेंट काँक्रीटीकरण करण्यासाठी १८ कोटी व जामगाव येथे प्रस्तावित चिंतामणराव देशमुख उद्यानासाठी २२ कोटी निधी उपलब्ध करून देण्यात आला असल्याचे खासदार सुनील तटकरे यांनी रोहा येथील शासकीय विश्रामगृह येथे आयोजित पत्रकार परिषदेत माहिती दिली.



या वेळी माजी उपनगराध्यक्ष महेंद्र गुजर, राजेंद्र जैन, महेश कोलटकर, रवी चाळके, निलेश शिर्के आदी उपस्थित होते. खासदार सुनील तटकरे यांनी या वेळी रायगड जिल्ह्यात विविध विकास कामांसाठी मोठ्या प्रमाणात निधी आणल्याची माहिती दिली. तालुक्यातील जामगाव येथे डॉ. चिंतामणराव देशमुख यांचे स्मारक म्हणून औषधी वनस्पतींचे उद्यान तयार करण्यात येणार असून मंत्री आदिती तटकरे यांच्या प्रयत्नाने उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी २२ कोटींचा उपलब्ध करून देण्यात आला आहे. वाकण–रोहा–खारी–तांबडी–घोसाळे–खाजगी–मानदाड–म्हसळा रस्त्यासाठी अंदाजे २०० ते २५० कोटी निधी खर्च होणार आहे.

टोळ–आंबेत–श्रीवर्धन या रस्त्याला ३५० कोटींच्या आसपास निधी मंजूर करण्यात आला आहे. हे दोन्ही रस्ते सिमेंट काँक्रीटीकरण होणार आहेत. एमआयडीसीलगत असलेल्या धाटाव, वाशी, लांडर, महादेववाडी, कारिवणे, आणि तळाघर अंतर्गत रस्ते करण्यासाठी उद्योग मंत्री उदय सामंत यांच्याकडे मंत्री आदिती तटकरे यांनी पाठपुरावा केला असून या रस्त्यांना १८ कोटींच्या निधीला मान्यता उद्योग मंत्री उदय सामंत यांनी दिली आहे.

रोहा ते किल्ला, किल्ला ते आंबेवाडी नाका, अशोकनगर ते भुवनेश्वर पथदिव्यांना मान्यता मिळाली असून याचे काम ही लवकर सुरू होईल, अशी माहिती खासदार सुनील तटकरे यांनी दिली आहे. पथदिव्यांमुळे धाटाव औद्योगिक क्षेत्रातील कारखान्यात कामासाठी येणाऱ्या कामगारांना सोयीचे ठरणार आहे.

---

## निवडक

### जातीचे दाखले काढण्यासाठी प्रतिसाद



**चौक** : खालापूर तालुक्यातील उंबरे येथे अनुसूचित जमातीचे दाखले काढण्यासाठी आयोजित केलेल्या कार्यक्रमाला ग्रामस्थांनी उत्स्फूर्त प्रतिसाद दिला. उरण सामाजिक संस्थेच्या वतीने व खालापूर तहसील कार्यालयाच्या सौजन्याने ग्रुप ग्रामपंचायत उंबरे यांच्या सहकार्याने खालचे उंबरे आदिवासीवाडी, सतरा आंबा आदिवासीवाडी, सतिमाळ आदिवासीवाडी येथील आदिवासी समाजबांधवांचे जातीचे दाखले काढून देण्यासाठी हे शिबिर आयोजित करण्यात आले होते. ज्यांना शिबिराचे ठिकाणी शक्य नव्हते, अशा वयोवृद्ध व दिव्यांगांच्या घरापर्यंत जाऊन अर्ज भरण्यात आले. उंबरे प्रशासक व विस्तार अधिकारी शैलेंद्र तांडेल, मंडळ अधिकारी चंद्रशेखर खोत, तलाठी उंबरे एच. एन. सरगर, राजेंद्र मढवी, सरपंच महेश पाटील यांच्यासह कर्मचाऱ्यांनी शिबिरासाठी परिश्रम घेतले.

### आयुष्मान कार्ड बनविणे शिबिर



**पाली** : अलिबाग तालुक्यातील नवीन देहेन भाकरवड गावामध्ये सक्षम बहुउद्देशीय सामाजिक संस्थेचे उपाध्यक्ष अरुणशेठ मधुकर पाटील यांच्या वाढदिवसानिमित्त मोफत आयुष्यमान कार्ड बनविण्यासाठी लाभार्थी मोठ्या संख्येने हजर होते. या वेळी संस्थेचे अध्यक्ष लहु म्हात्रे, सचिव कमलाकर पाटील, खजिनदार काशीनाथ पाटील, उपखजीनदार बबन पिंगळे, संस्थेचे सल्लागार अ‍ॅड. दामोदर पाटील, सदस्य दत्तात्रेय पाटील, मनोज पाटील, डॉ. शंकर शितोळे, प्रभाकर घरत, धनंजय धुमाळ, अलिबाग तालुका महिला संघटक जितेश्री पाटील, हभप जनार्धन पाटील, हभप प्रेमनाथ राऊत आदी उपस्थित होते.

### दत्त महाराजांच्या डोंगराला परिक्रमा

**रेवदंडा** : चौल–भोवाळे येथील पर्वतनिवासी दत्त महाराजांच्या डोंगराला गुरुवारी (दि. २१) परिक्रमा करण्यात आली. टाळ–मृदुंगाचा गजर आणि जोडीला एका सुरात अव्याहतपणे होणारा दत्तनामाचा गजर यामुळे परिक्रमेचा मार्ग दुमदुमून गेला. या वेळी शेकडो दत्तभक्त उपस्थित होते. वार्डे गुरुजी दत्त आरती मंडळ चौल यांच्या मार्गदर्शनाखाली दत्तमहाराजांच्या प्रतिमेची पालखी परिक्रमा आयोजित करण्यात आली होती. हा नयनरम्य सोहळा पाहण्यासाठी ठिकठिकाणी मुख्य रस्त्यावर भाविकांची गर्दी जमली होती. सुवासिनींकडून दत्त महाराजांचे औक्षण करण्यात आले. दुपारी पालखी मंदिरातून मार्गस्थ झाली. स्वामी समर्थ मंदिरमार्गे, पुढे सराई, सोमेश्वर मंदिर, हनुमानपाडा अशी मार्गक्रमण करीत भोवाळे येथून दत्त मंदिरात सायंकाळी ६ वा.च्या सुमारास प्रस्थान झाले.

---

# पुण्याच्या सायकलस्वारांचे मुरूड शहरात स्वागत

**मुरूड : प्रतिनिधी**

पुणे येथील स्वरूपवर्धिनी संस्थेचे ८० विद्यार्थी सायकलवरून मुरूडमध्ये दाखल झाले आहेत. मुरूड पद्मदुर्ग जागर व गड संवर्धन समितीच्या वतीने त्यांचे स्वागत करण्यात आले.

या वेळी मुरुड पद्मदुर्ग जागर व गड संवर्धन समितीचे उपाध्यक्ष राहुल कासार, सुनील शेळके, प्रवीण पाटील, महेंद्र मोहिते, रूपेश जामकर, प्रमोद मसाल, अच्युत चव्हाण, प्रदीप बागडे, महेश साळुंखे, पुणे येथील विनेश नगरे, निशिकांत वाईकर, तुषार काबदुले आदींसह ८० विद्यार्थी उपस्थित होते. प्रथम स्वरूपवर्धिनी संस्थेचे निलेश धायरकर यांचे स्वागत पद्मदुर्ग जागर व गड संवर्धन समितीचे रूपेश जामकर यांनी शाल, पुष्पगुच्छ देऊन करण्यात आले.

निलेश धायरकर यांनी सांगितले की, ८० विद्यार्थी सायकल चालवत मुरूडमध्ये आलो असून आमचे ध्येय राजे शिवछत्रपती महाराजांनी बांधलेला पद्मदुर्ग किल्ला व परिसर स्वच्छ करणे हा आहे. राजे शिवछत्रपती महाराजाचे किल्ले जे पडिक झालेत ते शासनाने संवर्धन व जतन केले पाहिजे. किल्ल्याची व्यवस्थित निगा राखणे खूप महत्त्वाचे आहे. यासाठी राज्य शासनाने सजग व दक्ष राहून किल्ल्याची जपवणुकीवर अधिक खर्च केला पाहिजे, अशी मागणी त्यांनी केली.



---

# राजर्षि शाहू महाराज शिष्यवृत्ती योजनेसाठी मुदतवाढ

**रायगड : रामप्रहर वृत्त**

अनुसूचित जातीच्या विद्यार्थ्यांना प्रवेशासाठी राजर्षि शाहू महाराज शिष्यवृत्ती योजनेकरिता अर्ज सादर करण्यास ४ जानेवारी २०२४पर्यंत मुदतवाढ देण्यात आली असल्याची माहिती सहाय्यक आयुक्त, समाज कल्याण सुनील जाधव यांनी दिली आहे.

राज्यातील १०० अनुसूचित जातीच्या, नवबौद्ध घट्कांतील विद्यार्थ्यांना या योजनेचा लाभ देण्यात येतो. या योजनेसाठी पात्र विद्यार्थ्यांस पूर्ण शिक्षण शुल्क, नोंदणी फी, जिमखाना, ग्रंथालय, संगणक शुल्क संबंधित संस्थेमार्फत विद्यार्थ्यांच्या आधारसंलग्न बँक खात्यात जमा करण्यात येते. वसतीगृह व भोजन शुल्काचादेखील खर्च देण्यात येणार आहे, तसेच पुस्तकांसाठी पाच हजार रुपये व इतर शैक्षणिक खर्चासाठी पाच हजार असे रुपये १० हजार दोन टप्प्यात अदा केले जाणार आहे.

या योजनेविषयी आधिक माहिती, जाहिरात, अर्ज व नियमावली शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर प्रसिद्ध झाली आहे. या संकेतस्थळावरून विहित अर्जाचा नमुना डाऊनलोड करुन तो परिपूर्ण भरुन कागदपत्रांसह ४ जानेवारी २०२४ रोजी सायंकाळी ६:१५ वाजेपर्यंत आयुक्त, समाज कल्याण, महाराष्ट्र राज्य, ३ चर्च पथ पुणे येथे सादर करावा, असे आवाहन केले आहे.

---

# अंबा नदीपात्रात कचऱ्याचा ढीग अन् दारूच्या बाटल्यांचा खच; नागरिकांमध्ये नाराजी

**सुधागड** : वऱ्हाड–जांभूळपाडा ग्रुप ग्रामपंचायत हद्दीतील अंबा नदीपात्रात दारूच्या बाटल्या व घाणीचे साम्राज्य व पसरले आहे. यामुळे नदीचे अस्तित्वदेखील धोक्यात आले आहे.

जांभूळपाडा येथे वाहणाऱ्या अंबानदीपात्रात कचरा टाकला जात आहे. एकीकडे पर्यावरणप्रेमींकडून नद्या वाचविण्यासाठी विविध स्तरावर प्रयत्न करण्यात येत आहेत, तर दुसरीकडे परिसरातील नागरिक कचरा नदीपात्रात आणून टाकत आहे. नदीकिनारी प्लास्टिकच्या पिशव्या तसेच दारूच्या बाटल्यांचा ढिग पडला आहे.

या कचऱ्यामुळे परिसरात दुर्गंधी पसरली आहे. याबाबत लवकर लवकर उपाययोजना व्हावी, अशी मागणी जोर धरीत आहे.



---

# सलग सुट्ट्यांमुळे मुरूड पर्यटकांनी हाऊसफुल्ल!

**मुरूड : प्रतिनिधी**

नाताळसह सलग सुट्ट्या आल्याने पर्यटकांनी मुरूडला मोठ्या संख्येने हजेरी लावली आहे. त्यामुळे मुरूड सध्या हाऊसफुल्ल झाले आहे.

मुरूडमध्ये सध्या समुद्रकिनाऱ्याच्या सुशाभिकरणाचे काम अंतिम टप्प्यात आले आहे. त्याचप्रमाणे पर्यटकांना किनाऱ्यावर बोटिंग, समुद्रातील जलदुर्गावर जाण्यासाठी बोटींची सोय, किनाऱ्यावरील बागांचे सुशोभीकारण, समुद्राकिनारी सुसज्ज पार्कींग यामुळे पर्यटकांना निर्धास्तपणे गाडी किनाऱ्यावर लावून समुद्रात पोहण्यासाठी जाता येणार आहे. त्यातच २९ ते ३१ डिसेंबरदरम्यान मुरूड पर्यटन महोत्सव असल्याने विविध कार्यक्रमांचे नियोजन करण्यात आले आहे.

मुरूडला पर्यटकांची गर्दी झाल्याने पोलीसही सतर्क झाले आहेत. समुद्रकिनारी वाळूत वाहने नेण्यास मनाई करण्यात आली आहे. समुद्रात पोहणाऱ्यांवर बारीक लक्ष आहे. पालिका समुद्रकिनारी दिवसातून तीन वेळा स्वच्छ करीत आहेत.

किनाऱ्यावरील विविध खाद्यपदार्थांचा आस्वाद पर्यटक घेत आहेत. पालिका किनाऱ्यावरील स्टॉलधारकांचा कचरा दोन वेळा उचलते. त्यामुळे समुद्रकिनारा स्वच्छ राहतो व पर्यटक आनंदाने फिरू शकतात.



---

# आयईएसपी प्रशिक्षणाच्या माध्यमातून विद्यार्थ्यांना रोजगार



**खालापूर : प्रतिनिधी**

आयईएसपी प्रशिक्षणाच्या माध्यमातून विद्यार्थ्यांना रोजगार उपलब्ध होत असल्याची माहिती देण्यासाठी शुक्रवारी (दि.२२) आयईएसपी प्रशिक्षण इन्स्टिट्यूटमध्ये संचालक गॅरी खन्ना पत्रकार परिषद आयोजित करण्यात आली होती.

या वेळी केटीएसपी. मंडळाचे अध्यक्ष संतोष जंगम, माजी नगराध्यक्ष शिवानी जंगम, ग्लोबल मनिष कौल, मारीया मॅथिव आदी उपस्थित होते. आयईएसपी प्रशिक्षणाच्या माध्यमातून रोजगार उपलब्ध झालेल्या विद्यार्थ्यांनी अनुभव सर्वांसमोर सांगितले. अनेक तरुण या ठिकाणी प्रशिक्षण घेण्यासाठी येत असून तीन ते नऊ महिने प्रशिक्षण देवून आम्ही त्यांस नोकरीला लावत असल्यांचे सीएमडी ए. एस. खन्ना यांनी सांगितले.

विविध क्षेत्रामध्ये रुजू झालेल्या तरुण वर्गांनी शुभेच्छा दिल्या. युगांत आंबावणे यांनी कंपनीचे आभार मानले. आयईएसपी अंतर्गत ऐरावत ही शाखा असून या माध्यमातून आजपर्यंत हजारो विद्यार्थ्यांना यशस्वीरित्या प्रशिक्षित देण्यात आले.

खालापूर येथे कॅम्पसमध्ये विमानचालक, आदरातिथ्य, आरोग्य सेवा, रस्तासुरक्षा आणि लॉजिस्टिक, नोकरीसाठी व्यावहारिक प्रशिक्षण दिले जात असल्याचे सांगितले. याचबरोबर केएमसी कॉलेज खोपोली येथील ५० विद्यार्थ्यांना ही कंपनी प्रशिक्षण देत आहे.

---

# सुशोभिकरणाने झळाळून निघाले ‘भोगावती’चे सौंदर्य

### पेणमध्ये गणपती विसर्जन घाटाचे लवकरच लोकार्पण

**पेण : प्रतिनिधी**


पेण नगर परिषदेचा नव्याने बांधण्यात आलेल्या वैशिष्ट्यपूर्ण योजनेंतर्गत दोन कोटी खर्चाच्या भोगावती गणपती विसर्जन घाट सुशोभीकरणाचे काम पूर्ण झाले आहे. ९५ मीटर लांबीचा हा प्रशस्त घाट असून गणेश विसर्जनानंतरही दैनंदिन निवांत क्षण अनुभवण्यासाठी सकाळ, संध्याकाळ नागरिकांसाठी उपयुक्त ठरणार आहे.

सध्या या बांधकाम केलेल्या १०० मीटर परिसरात केलेल्या दिव्यांच्या विद्युत रोषणाईत भोगावती नदीचे सौंदर्य झळाळून निघाले आहे. शहरातील कासार तलाव, साईमंदिर परिसर, कौंडाळ तलाव, मोतीराम तलाव, नाना नानी पार्क याबरोबरच आता भोगावती नदी तट, भुंडा पूल पर्यटन स्पॉट ठरणार आहे.

पेण शहराची जीवनवाहिनी भोगावतीची अनेक रुपे वर्षभरात पेणकरांना पहावयास मिळतात. गणेशोत्सवात विसर्जन करण्यासाठी येणाऱ्या भक्तांना आता बाप्पाच्या मूर्ती ठेवण्यासाठी व विधीवत पूजन करण्यायोग्य ऐसपैस जागा उपलब्ध झाली आहे. नगर प्रशासनाच्या बांधकाम विभाग अभियंता सुहास कांबळे, सहाय्यक अभियंता विनायक बनसोडे यांनी नदीतटाचे सौंदर्य वाढावे अशी अनुरूप कामगिरी बजावली आहे. त्यामुळे या ठिकाणी आता पेणमधील नागरिकांची वर्दळ वाढणार आहे.

या निधीसाठी आमदार रविशेठ पाटील यांनी पाठपुरावा केला आणि मुख्यमंत्री एकनाथ शिंदे, उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या माध्यमातून हा निधी उपलब्ध झाला असून याकामी माजी नगराध्यक्ष प्रितम पाटील, माजी गटनेते अनिरुद्ध पाटील यांनी पुढाकार घेतल्याने पेण शहरातील अनेक विकासकामांना निधी मंजूर झाला.

लवकरच या व इतर कामांचा लोकार्पण सोहळा आयोजित करण्यात येणार असल्याची माहिती मुख्याधिकारी जीवन पाटील यांनी दिली आहे.



---

# रोह्यातील चिंचवली तर्फे आतोणेमध्ये विकासरथ दाखल

**धाटाव : प्रतिनिधी**

रोहा तालुक्यातील चिंचवली तर्फे आतोणे ग्रामपंचायतीमध्ये विकसित भारत रथ विविध योजनांची माहिती देण्यासाठी दाखल झाला. कृषी अधिकारी शिंदे, आरोग्य सेवक महेंद्र पवार, भाग्यश्री सिंह, तळाटी रमेश धावरे, कोतवाल गजानन जाधव, ग्रामसेवक राजु देसाई या शासकीय अधिकाऱ्यांनी योजनेची माहिती नागरिकांना दिली.



प्रत्येक तालुक्यातील वनविभाग हा उज्ज्वला गॅसच्या माध्यमातून डोंगराळ भागातील लोकांना लाभ दिला जातो. याचा फायदा घ्यावा, असे आव्हान भाजप नेत्या छाया तारु केले. या वेळी प्रभारी सरपंच संजय मोते, सदस्य संगीता पवार, रोशनी बारस्कर, लक्ष्मण धनावडे, माजी तंटामुक्त अध्यक्ष रविंद्र तारु, रोशन बारसर, मादुराम मुसले, रामा शिर्के, ग्रामस्थ उपस्थित होते.

## निवडक



### पारस काव्य, कला पुरस्कार सोहळा

**उरण** : सानपाडा येथील पारस काव्य, कला, जनजागृती संस्थेतर्फे राज्यस्तरीय खुली काव्यलेखन स्पर्धा पारितोषिक वितरण सोहळ्याचे आयोजन करण्यात आले होते. विविध क्षेत्रात विशेष कामगिरी करणाऱ्या ८० गुणवंतांचा या वेळी सन्मान करण्यात आला. आगरी कवितांचे बादशाहा पुंडलिक म्हात्रे यांनी कार्यक्रमाचे अध्यक्षस्थान भूषविले होते. प्रमुख पाहुणे म्हणून सामाजिक सेविका सिंधू बांडे, मुख्याध्यापक गणेश सलवदे, लेखक संजय बर्वे उपस्थित होते. कवी पुंडलिक म्हात्रे यांना विश्वभूषण पुरस्कार, प्रा. शंकर गोपाळे यांना सर्वोत्कृष्ठ निवेदक, तसेच राज्यस्तरीय काव्य स्पर्धेतील प्रथम तीन क्रमांकाच्या कवींना सन्मानचिन्ह आणि प्रमाणपत्र देऊन गौरविण्यात आले. या वेळी मोठ्या संख्येने नागरिक उपस्थित होते.

### नियम पाळण्याची रिक्षाचालकांची प्रतिज्ञा



**नवी मुंबई** : नेरूळ परिसरातील रिक्षाचालकांना वाहतूक पोलिसांकडून होणारी कारवाई आदी विविध समस्यांना सामोरे जावे लागते. शिव वाहतूक सेवा नवी मुंबईचे अध्यक्ष दिलीप आमले यांच्या पुढाकाराने बैठकीचे आयोजन केले होते. या वेळी रिक्षाचालकांच्या समस्या वाहतूक विभागाचे पोलीस निरीक्षक श्रीकृष्णा धामणपूरकर यांच्याकडे मांडल्या. रिक्षाचालकांनी नियमानुसार व्यवसाय करावा, लायसन्स, बॅच नेहमी जवळ बाळगावे, गणवेश परिधान करणे आवश्यक आहे. चौकामध्ये रिक्षा उभ्या करू नयेत तसेच आपल्या वाहनामुळे कुठल्याही प्रकारच्या वाहतूक अडथळा होणार नाही याची काळजी घ्यावी. सिग्नल नियमांचे पालन करावे. व्यसन करून वाहने चालवू नयेत, आदी विविध नियमांवर पोलिस निरीक्षक धामणकर आणि आमले यांनी रिक्षाचालकांना मार्गदर्शन केले. रिक्षाचालकांनी वाहतुकीचे फलक दाखवून मी नियमाप्रमाणे वाहन चालविण्याची प्रतिज्ञा केली.

### स्थानिकांना संरक्षण प्रशिक्षण

**नवी मुंबई** : सामाजिक कार्यकर्त्या सुवर्णा हाडोळे यांच्या मागणीनुसार नागरिक संरक्षण दलाच्या वतीने स्थानिकांना प्रशिक्षण देण्यात आले. या शिबिराला उत्स्फूर्त प्रतिसाद मिळाला. नेरूळ सेक्टर १८ येथील शहीद तुकाराम ओंबाळे सभागृहात पाच दिवसांचे नागरिक संरक्षण प्रशिक्षण शिबिर घेण्यात आले. या वेळी नागरी संरक्षण दल ठाण्याचे उपनियंत्रक विजय जाधव, सहायक उपनियंत्रक आनंद सिंग गढरी, उपमुख्य क्षेत्ररक्षक कर्मवीर सिंग आणि विभागीय क्षेत्ररक्षक म्हणून कार्यकर्त्या असणाऱ्या सुवर्णा हाडोळे उपस्थित होत्या. पाच दिवसांच्या या शिबिरात स्वयंसेवकांना गस्त घालणे, प्रथमोपचार करणे, आग विझवणे, संकटग्रस्तांची सुटका करणे, वाहतुकीचे नियंत्रण करणे, त्याचबरोबर संचालनाचे प्रशिक्षण देण्यात आले.

# कोविड प्रतिबंधासाठी नवी मुंबई महापालिका सज्ज

**नवी मुंबई : बातमीदार**

काही राज्यांमध्ये कोविडचा जेएन-१ या नवीन विषाणू प्रकारातील रुग्ण आढळत असून सिंधुदुर्ग, ठाणे भागातही काही रुग्ण आढळले आहेत. या अनुषंगाने खबरदारी घेत नवी मुंबई महापालिका आयुक्त राजेश नार्वेकर यांनी तातडीने बैठक घेत आरोग्य यंत्रणेसह संबंधित सर्व विभागांना दक्षतेने सज्ज राहण्याचे आदेश दिले आहेत.



वाशी, नेरूळ व ऐरोली या महापालिकेच्या तीन रुग्णालयात व्हेंटीलेटर्ससह ६० आयसीयू बेड्सची कोव्हीड रुग्णालय स्वरुपातील सुविधा, २०० ऑक्सिजन बेड्सची आरोग्य केंद्र आणि २०० सर्वसाधारण बेड्सची कोव्हीड काळजी केंद्र तत्काळ कार्यान्वित करण्याचे निर्देश आयुक्तांनी या वेळी दिले. त्याचप्रमाणे दैनंदिन ओपीडीमध्ये जे रुग्ण संशयित वाटतात त्यांची कोविड टेस्ट करावी, नोडल अधिकाऱ्यांची त्वरित नेमणूक करण्याचेही आयुक्तांनी निर्देशित केले.

नवी मुंबई महापालिकेची स्वत:ची चार हजार चाचण्या प्रतीदिन क्षमतेची आरटीपीसीआर लॅब असून ती कोविड टेस्टींगसाठी सक्षमतेने कार्यान्वित राहील याकडेही विशेष लक्ष देण्याच्या सूचना आयुक्तांनी केल्या. येथील चाचण्यांवर कोविड नियंत्रणासाठी नेमलेल्या नोडल अधिकाऱ्याने बारकाईने लक्ष देण्याचे व दैनंदिन अहवाल सादर करण्याचे निर्देश आयुक्तांमार्फत देण्यात आले.

या बैठकीस अतिरिक्त आयुक्त सुजाता ढोले, प्रशासन विभागाचे उपायुक्त शरद पवार, शहर अभियंता संजय देसाई, वैद्यकीय आरोग्य अधिकारी डॉ. प्रशांत जवादे, उपआयुक्त डॉ. बाबासाहेब राजळे, सोमनाथ पोटरे, डॉ. श्रीराम पवार, योगेश कडूसकर, डॉ. राहुल गेठे, अतिरिक्त शहर अभियंता मनोज पाटील व शिरीष आरदवाड, वैद्यकीय अधिकारी डॉ. अजय गडदे आणि संबंधित अधिकारी उपस्थित होते. त्यासोबतच अनुषांगिक रुग्णालयीन सुविधा, मनुष्यबळ, औषधे, पीपीई किट्स, मास्क, सॅनिटायझर अशा बाबींची उपलब्धता तपासून घ्यावी व त्याचा अहवाल सादर करावा असेही निर्देश आयुक्तांनी दिले.

**अफवांवर विश्वास ठेवू नये!**

कोविडचा नवीन विषाणू आढळला असला तरी नागरिकांनी घाबरुन जाण्याची गरज नसून कोणत्याही प्रकारे अफवांवर विश्वास ठेवू नये तसेच चुकीच्या माहिती व बातम्या प्रसारित होणार नाहीत याची दक्षता घ्यावी. त्याचप्रमाणे आजाराची लक्षणे असल्यास गर्दीच्या ठिकाणी जाणे टाळावे व मास्कचा वापर करावा आणि योग्य औषधोपचार घ्यावा, असे आवाहन आयुक्त राजेश नार्वेकर यांनी केले आहे.

## नवी मुंबईत आगामी निवडणुकांसाठी भाजपची मोहीम

**नवी मुंबई : बातमीदार**

भारतातील विविध वर्ग नवी मुंबईत वसला असल्याने शहराला मिनी इंडियादेखील संबोधले जाते. भाजपने आगामी लोकसभा निवडणुकांसाठी आपली मोहीम सुरू केली असून या शहरातील उत्तर भारतीयांची निर्णायक मते आपल्यासोबत जोडण्यासाठी प्रयत्न सुरू केले आहेत. उत्तर भारतीय मोर्चातर्फे ही मोहीम राबवली जात आहे.

यात तब्बल १३ राज्यांतील नागरिकांचे लक्ष्य उत्तर भारतीय भारतीय मोर्चाने ठेवले आहे. त्यानुसार भाजप उत्तर भारतीय मोर्चाचे जिल्हाध्यक्ष राजेश राय व त्यांचे सहकारी प्रत्येक वॉर्डनिहाय नागरिकांची भेट घेत आहेत.

नवी मुंबईत उत्तर भारतातील नागरिक मोठ्या प्रमाणात वसले आहेत. मतदान प्रकियेत या नागरिकांची मते निर्णायक ठरत असतात. भाजपने उत्तर भारतीय नागरिकांना आपल्या समाजातील नेता देऊन त्यांची मोट बांधण्याचे काम सुरू केले आहे. उत्तर भारतीय मोर्चाचे जिल्हाध्यक्ष राजेश राय यांच्यामार्फत उत्तर भारतीयांची मोट बांधण्याचा प्रयत्न केला आहे. तब्बल तिसऱ्या वेळेस राय यांच्यावर विश्वास ठेवून त्यांची नियुक्ती उत्तर भारतीय मोर्चाच्या जिल्हाध्यक्षपदी करण्यात आली आहे. त्यानुसार राजेश राय हे पक्षाच्या रणानितीनुसार उत्तर भारतीय कार्यकर्त्यांसह वॉर्ड पिंजून काढत प्रत्येकाशी संवाद साधत आहेत. यात मोदी सरकारच्या योजनादेखील सांगितल्या जात आहेत. त्याबाबत जागृती केली जात आहे.

मतदार नोंदणी केली जात आहे. उत्तर भारतीयांच्या समस्या थेट वरिष्ठांपर्यंत पोहचवल्या जात आहेत. मुख्य म्हणजे उत्तर प्रदेश, बिहार, झारखंड नाही तर तब्बल १३ राज्यातील नागरिक त्यामुळे भाजपशी जोडले जात आहेत. याबाबतचा अहवाल भाजप उत्तर भारतीय मोर्चा प्रदेशाध्यक्ष संजय पांडे व नवी मुंबई भाजप जिल्हाध्यक्ष संदीप नाईक यांच्यापर्यंत पोहोचत आहे.

## नवी मुंबई वाहतूक पोलिसांकडून प्रदूषणासंदर्भात जनजागृती

**नवी मुंबई : रामप्रहर वृत्त**

महापे वाहतूक शाखेने शनिवारी वाहनांच्याद्वारे होणारे वाहन प्रदूषण आणि त्यावरील उपाययाबाबत जनजागृती कार्यक्रमाचे आयोजन शनिवारी (दि. २३) केले होते. या जनजागृतीत विद्यार्थ्यांचा सहभाग होता.

महापे वाहतूक शाखा चौकी येथे महानगरपालिका माध्यमिक शाळा, महापे गाव येथील नववी व दहावीच्या विद्यार्थ्यांचा वाहन प्रदूषण जनजागृती करण्यात आली. तीन शिक्षक व २५ विद्यार्थी व नागरिक तसेच महापे वाहतूक शाखेचे पोलीस अंमलदार उपस्थित होते.



## विद्यार्थ्यांनी बुद्धिमानी व्हावे -आचार्य वसुधा

**नवी मुंबई : बातमीदार**

पुणे विद्यार्थी गृहाच्या नेरूळ येथील विद्याभवन शिक्षण संकुलात साजरा करण्यात आलेल्या गीता जयंती उत्सवात प्रमुख वक्त्या आचार्य वसुधा चैतन्य यांनी विद्यार्थ्यांना मनमानी होण्यापेक्षा बुद्धिमानी व्हा असा मोलाचा सल्ला दिला.

गीताजयंतीनिमित्त पुणे विद्यार्थी गृहाच्या माजी विद्यार्थी मंडळ मुंबईकडून वर्षभरात घेतलेल्या आंतरशालेय गीता वक्तृत्व, गीता पाठांतर आणि सदाचार चिंतनी वक्तृत्व या स्पर्धांमध्ये बक्षीसपात्र विद्यार्थ्यांचा यांच्या हस्ते गौरव करण्यात आला. या वेळी प्रमुख अतिथी आचार्य वसुधा चैतन्य यांनी शाळेतील उपक्रमांचे आणि विद्यार्थ्यांचे कौतुक केले. निरुत्साह घालवा, फक्त मनाने विचार न करता बुद्धीची कृतीला जोड द्या. श्रीकृष्ण, अर्जुन व रथाचे पाच घोडे त्याचबरोबर त्यांना रथाला आपले शरीर, मन व रथाचे पाच घोडे म्हणजे आपली इंद्रिय समजा, घोड्यांना



लगामाने बांधून ठेवल्यामुळे रथ आपण पाहिजे त्या ठिकाणी नेऊ शकतो, असे मार्गदर्शन त्यांनी विद्यार्थ्यांना केले. समन्वयक पांडुरंग मुळीक यांनी माजी विद्यार्थी मंडळाच्या कार्याची सर्व उपस्थितांना ओळख कारण दिली.

या वेळी साधक राजेश्वरी बी, भामा कृष्णन, प्रसन्ना, विद्याभवन संकुलाचे मुख्य समन्वयक पांडुरंग मुळीक, पर्यवेक्षक अस्मिता सलगर, शिक्षक, विद्यार्थी आणि पालक उपस्थित होते. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन प्रा. स्वाती मोटे यांनी केले.

## ज्ञानमंदिरात माजी विद्यार्थी मेळावा उत्साहात

**कळंबोली : प्रतिनिधी**

ज्ञानमंदिरात माजी विद्यार्थी मेळावा नुकताच म. ए .सो. ज्ञानमंदिर, कळंबोली येथे आयोजित करण्यात आला होता. कार्यक्रमाची सुरुवात सरस्वती व संस्थापकांच्या प्रतिमांचे पूजन प्रमुख पाहुणे म्हणून उपस्थित असणारे माजी विद्यार्थी डॉ. नितीन पाटील, डॉ. विशाल जाधव, सचिन खुस्पे तसेच विद्यालयाचे मुख्याध्यापक धनंजय मेळकुंदे, मुख्याध्यापिका संजना बाईत, प्रियंका फडके यांच्या हस्ते करण्यात आली.

त्यानंतर संस्थेचा व शाळेचा २५ वर्षांचा इतिहास सांगणारी चित्रफित सतत समोर येत



होती. एकूण २०० माजी विद्यार्थी व शिक्षक उपस्थित होते. मुख्याध्यापक धनंजय मेळकुंदे यांनी, कवी कुसुमाग्रज यांच्या 'कणा' या कवितेतील पाठीवरती हात ठेवून फक्त लढ म्हणा या काव्यपंक्तीचा संदर्भ देऊन मार्गदर्शन केले. मनोगत व्यक्त करताना माजी विद्यार्थ्यांचा कंठ दाटून आला. सुनिता थोरात यांनी उपस्थितांचे आभार मानले.

सूत्रसंचालन दत्तात्रय म्हात्रे यांनी केले. या कार्यक्रमासाठी पुण्याहून संस्थेचे पदाधिकारी विनायक शुक्ल व आनंद लेले हे उपस्थित होते. कार्यक्रमासाठी शाळा समिती अध्यक्ष देवदत्त भिशीकर व महामात्र डॉ. रविकांत झिरमिटे यांचे मार्गदर्शन मिळाले. कार्यक्रमाची सांगता स्वस्ती पाटील यांनी वंदे मातरम् गाऊन केली.

# दूषित पाणीपुरवठा बंद न झाल्यास आंदोलन करणार



## माजी नगरसेवक सुरज पाटील यांचा इशारा

**नवी मुंबई : प्रतिनिधी**

सारसोळे गाव, सेक्टर ६ परिसरात गेल्या तीन ते चार दिवसांपासून दूषित पाणीपुरवठा होत आहे. रहिवाशांना याचा प्रचंड त्रास होत असून भाजप माजी नगरसेवक सुरज पाटील यांनी दूषित पाणीपुरवठा बंद करण्याची मागणी महापालिका आयुक्तांकडे केली आहे.

ही समस्या तत्काळ दूर झाली नाही तर आंदोलनाचा इशारा दिला आहे. दूषित पाण्यामुळे नागरिकांच्या आरोग्याचा प्रश्न निर्माण झाला आहे.

याबाबत सुरज पाटील यांनी पालिका आयुक्तांना निवेदन दिले असून दूषित आणि गढूळ पाण्याचे नमुने त्यांच्या माहितीसाठी पाठवले आहेत. पालिका प्रशासनाला त्वरित उपाययोजना करण्याची विनंती केली आहे, मात्र या अनुषंगाने कार्यवाही झाली नाही तर महापालिका मुख्यालयावर मोर्चा काढण्याचा इशाराही दिला आहे.

## भाताच्या गंजीला लागली आग

**पनवेल : वार्ताहर**

वांगणी येथे भाताच्या गंजीला अज्ञाताने आग लावल्याने शेतकऱ्याचे नुकसान झाले आहे.

वांगणी येथील संजय घरत यांनी भातकापणी करून गावाच्या बाहेर भाताची गंजी रचून ठेवली होती. या गंजीला अज्ञाताने आग लागली. याची माहिती रात्री १० ते ११ वा. च्या दरम्यान समजली. शेतकऱ्यांनी घटनेची माहिती पनवेल तालुका पोलिसांना दिली.

काही वेळातच पनवेल तालुका पोलीस घटनास्थळी दाखल झाले. अग्निशमन दलाच्या मदतीने ही आग विझवण्यात आली, मात्र या आगीमध्ये पूर्ण भात जळाला असून शेतकऱ्याचे नुकसान झाले आहे. याप्रकरणी पनवेल तालुका पोलीस ठाण्यात तक्रार देण्यात आली असून पोलीस अधिक तपास करत आहेत.

# 'माझी वसुंधरा' अंतर्गत सीडबॉलचे वाटप

**नवी मुंबई : बातमीदार**

शहर स्वच्छतेप्रमाणेच पर्यावरण संरक्षण व संवर्धनाकडे विशेष लक्ष देणारी नवी मुंबई महापालिका क वर्ग महापालिकांमध्ये राज्यातील प्रथम क्रमांकाची पर्यावरणशील महापालिका म्हणून नावाजली गेली आहे. या अनुषंगाने पर्यावरण जपणूक व संवर्धन कार्यात नेहमीच जनतेचा मोठ्या प्रमाणावर सहभाग करून घेण्यात येत असतो.

याच प्रकारचा एक अभिनव उपक्रम नवी मुंबई महापालिका व माता अमृतानंदमयी मठ, नेरूळ यांच्या संयुक्त विद्यमाने माझी वसुंधरा अभियान अंतर्गत राबविण्यात आला असून त्यामध्ये बीज चेंडू अर्थात सीडबॉल वितरणाच्या अनोख्या उपक्रमाचे



### लोकसहभागातून स्वच्छता मोहीम

आयोजन करण्यात आले होते.

या वेळी उपस्थितांना माझी वसुंधरा अभियानाची माहिती घनकचरा व्यवस्थापन विभागाचे उपायुक्त डॉ. बाबासाहेब राजळे यांनी दिली व जनतेने यामध्ये स्वयंस्फूर्तीने सहभागी व्हावे असे आवाहन केले. या वेळी सीडबॉल वितरणाप्रमाणेच ज्वेल ऑफ नवी मुंबई या पर्यटनस्थळी ३००हून अधिक एनएसएसच्या विद्यार्थ्यांसह नागरिकांच्या सहभागातून परिसर स्वच्छता मोहीम राबविण्यात आली. उपस्थित ४००हून अधिक विद्यार्थी व नागरिकांना सीडबॉलचे वाटप करण्यात आले.

या वेळी घनकचरा व्यवस्थापन विभागाचे उपायुक्त डॉ. बाबासाहेब राजळे, बेलापूर विभागाचे सहाय्यक आयुक्त तथा विभाग अधिकारी शशिकांत तांडेल, मुख्य स्वच्छता अधिकारी विनायक जुईकर, स्वच्छता अधिकारी सूर्यकांत म्हात्रे व राजेंद्र इंगळे, पर्यावरण तज्ज्ञ भगवान केशव्वात, माता अमृतानंदमयी मठाचे स्वामी अव्ययामृतानंद पुरी, ललितामाई तसेच तेरणा इंजिनिअरिंग महाविद्यालयाचे, एसआयईएस महाविद्यालयाचे, एस. के. महाविद्यालयाचे एनएसएसचे विद्यार्थी व नागरिक उपस्थित होते.



**रसायनी : स्वामी विवेकानंद इंग्लिश मीडियम स्कूल, गूळसुंदे येथे श्री. प्रमोद झवेरी फाउंडेशन (शुभस्पर्श)च्या वतीने मुलांना बसण्यासाठी २४ बेंच देण्यात आले. या वेळी फाल्गुनी शुभदा पॉलिमर प्रॉडक्टचे एमडी देवांग झवेरी, विभाग प्रमुख मनोज गुरव, अजिवली स्कूलचे मुख्याध्यापक ससाणे, कमिटी अध्यक्ष आर.डी.पाटील, सरपंच मीनाक्षी पाटील, उपसरपंच अरुणा पाटील व इतर सदस्य उपस्थित होते.** (छाया : बी. एस. कुलकर्णी)



मुरुड : सलग सुट्ट्यांमुळे पर्यटनस्थळी गर्दी झाली असताना सी-गल पक्ष्यांनीही मोठ्या संख्येने हजेरी लावली आहे. हे पक्षी समुद्रकिनारी येणाऱ्या पर्यटकांचे लक्ष वेधून घेत आहेत. या पक्ष्यांचा सुधीर नाझरे यांनी टिपलेला नयनरम्य थवा.

# मुंबई-पुणेदरम्यान दुसऱ्या दिवशीही वाहतूक कोंडी

## बोरघाटात अनेक वाहने बंद; प्रवासी त्रस्त







**खोपोली : प्रतिनिधी**

सलग सुट्ट्यांमुळे मुंबई-पुणे महामार्ग व द्रुतगती मार्गावर मोठ्या प्रमाणात वाहने खंडाळा, लोणावळा व देवदर्शनासाठी पुणे दिशेला निघाल्याने बोरघाटात प्रचंड वाहतूक कोंडी झाली. घाटात तीव्र चढण असल्याने वारंवार ब्रेक मारावा लागल्याने क्लच प्लेट खराब होऊन अनेक प्रवासी वाहने बंद पडली. घाटात खोपोली हद्दीत १० ते १२ किलोमीटरपर्यंत वाहनांच्या रांगा दिसून आल्या.

शनिवार, रविवार, सोमवारी ख्रिसमस, मंगळवारी दत्तजयंती तसेच नवीन वर्षापर्यंत शाळांना पडलेली सुट्टी यामुळे मोठ्या प्रमाणात मुंबईकर आपल्या कुटुंबासहित पर्यटनाला बाहेर पडले आहेत. अशात जुन्या मुंबई-पुणे मार्गावर पुण्याकडे जाताना टाटा कॉलनी ते बोरघाट पोलीस चौकीपर्यंत मोठ्या प्रमाणात वाहने बंद असल्याचे दिसून आले.


घाटातून जाण्यासाठी रस्ता नसल्याने अनेक जणांनी वाहनांना धक्का मारत रस्त्याच्या कडेला उभे केल्याने वाहतूक कोंडीत भर पडली. आपल्या कुटुंबासह पर्यटनाला निघालेल्या वाहनांमध्ये महिला व लहान मुलांचाही समावेश होता. त्यामुळे या मंडळींना रस्त्यावर बसून रहावे लागले. टोईंग व्हॅन, मॅकेनिकच्या प्रतीक्षेत शेकडो प्रवासी घाटात पहावयास मिळाले.

पुढे जाण्याच्या घाईमध्ये अनेक वाहनांची एकमेकांना ठोकर लागण्याच्याही घटना पहावयास मिळाला. त्यामुळे वादविवादही झाले. वाहतूक कोंडीत अडकलेल्या वाहनचालकांची पोलिसांबरोबर त्याचप्रमाणे सामाजिक संघटनेच्या कार्यकर्त्यांबरोबर बाचाबाची झाली.

वाहनचालक शिस्तीचे पालन करीत नाही. त्यांना समजावून सांगितल्यास ते ऐकण्याच्या मनस्थितीत नव्हते, असे अपघातग्रस्त मदत टीमचे गुरूनाथ साठविलकर यांनी बोलताना सांगितले.

### पाणी, बिस्कीटचे वाटप

***वाहतूक कोंडीत अडकलेल्यांना मदतीचा हात म्हणून अनेक सामाजिक संघटना पुढे सरसावल्या. अपघातग्रस्त मदत टीमचे प्रमुख गुरूनाथ साठीलकर व त्यांच्या सहकाऱ्यांनी घाटामध्ये वाहतूक कोंडीत अडकलेल्यांना पाण्याची बॉटल त्याचप्रमाणे बिस्किटाचे पुडे देण्याची महत्त्वाची जबाबदारी पार पाडली. त्यामुळे अनेक वाहनचालकांनी त्यांचे आभार मानले.***



खालापूर : एक्स्प्रेस वेवर टोल भरण्यासाठी लागलेल्या रांगा.





## ऑईल सांडल्याने वाहने घसरली; चार जण जखमी, महिलेचा समावेश

**खालापूर : प्रतिनिधी**

बोरघाटात मुंबई-पुणे द्रुतगती मार्ग व जुन्या महामार्गावर शनिवार व रविवार असा दोन दिवस वाहतुकीचा विचका उडाला. त्यातच रविवारी सकाळी जुन्या महामार्गावरील बोरघाटात मॅकॅनिक पॉईंटजवळ एका ट्रकमधून लिक्वीड सोप वाहून नेणाऱ्या टाक्या मार्गावर कोसळून ते मार्गावर वाहू लागले. यामुळे महामार्ग निसरडा झाला आणि वाहने घसरू लागली.

वाहने घसरुन चार जण जखमी झाले. यामध्ये एका महिलेचा समावेश आहे. बोरघाट पोलीस आणि सामाजिक कार्यकर्ते यांनी मातीचा शिडकावा करून वाहतूक पूर्ववत केली. या घटनेने जुन्या महामार्गावर एक तास वाहतूक धिम्या गतीने सुरू होती. दरम्यान, खालापूर टोलनाक्यावर वाहनचालकांना भोंगा वाजवून शिस्तीने वाहने चालविण्याचे आवाहन करण्यात येत होते.

## खासदार सुनील तटकरे यांच्याकडून रोहा शहरातील विकासकामांची पाहणी

### अधिकाऱ्यांना सूचना



**रोहे : प्रतिनिधी**

रोहा शहरात विविध विकासकामे होत आहेत. प्रामुख्याने डॉ. चिंतामणराव देशमुख नाट्यगृह व कुंडलिक नदी येथील शिवस्मारक या कामांची पाहणी खासदार सुनील तटकरे यांनी शनिवारी (दि. २३) सायंकाळी केली.

या वेळी नगर परिषदेचे मुख्याधिकारी पंकज भुसे, अभियंता सुधीर भगत, माजी उपनगराध्यक्ष महेंद्र गुजर, राजेंद्र जैन, महेश कोलटकर, अहमद दर्जी, समिर सकपाळ, मकरंद बारटक्के, ॲड प्रशांत देशमुख, महेश सरदार, रवी चाळके, समाधान शिंदे, निलेश शिर्के, जगदिश देशमुख, चंद्रकांत पार्टे आदी उपस्थित होते.

रोहा शहरात तयार होत असलेल्या अद्ययावत सी. डी. देशमुख नाट्यगृहाची पाहणी खासदार सुनील तटकरे यांनी केली. या नाट्यगृह अंतर्गत आसन व्यवस्था, ध्वनी व्यवस्था, रंगमंच यासह अन्य विभागांची त्यांनी माहिती घेतली तसेच हे काम कसे चांगले करता येईल या संबंधित अधिकारी व ठेकेदारांना सूचना दिल्या.

याचबरोबर खासदार तटकरे यांनी कुंडलिक नदी संवर्धन येथे होत असलेल्या शिवस्मारक कामाची पाहणी केली. छत्रपती शिवाजी महाराज यांचा पुतळा बसविण्याची या ठिकाणी पाहणी केली. या वेळी त्यांनी शिवप्रेमींकडून याबाबत माहिती घेतली.



## गारवा वाढला

**अलिबाग : प्रतिनिधी**

डिसेंबर महिना संपत येत असताना हवेत गारवा वाढला आहे. त्यामुळे खासकरून सकाळी व रात्री थंडीतही वाढ होताना जाणवत आहे.

रायगड जिल्ह्यात यंदा हिवाळ्यात सुरुवातीला तापमानाचा पारा वरच असल्याने थंडीच नव्हती. नाही म्हणायला अधूनमधून काही दिवस गारवा असायचा, पण पुन्हा उकाडा होत असे. डिसेंबर महिन्यात वातावरण थंडगार बनले असून आल्हाददायक थंडीचा अनुभव सर्वांना येत आहे. दिवसेंदिवस पारा खाली सरकत असून ग्रामीण भागात जोरदार थंडी पडत आहे.

दरम्यान, या थंडीच्या हंगामात पर्यटकांची पावले जिल्ह्यातील पर्यटनस्थळांकडे वळू लागली आहेत. त्यामुळे स्थानिकांना रोजगारही मिळू लागला आहे.

## माणगाव तालुका पत्रकार संघाचा पुरस्कार वितरण, सत्कार सोहळा उत्साहात

**माणगाव : प्रतिनिधी**

माणगाव तालुका पत्रकार संघाचा पुरस्कार वितरण व सत्कार सोहळा कार्यक्रम शनिवारी (दि.२३) कुणबी भवन हॉल येथे शिवसेना उपनेते तथा विधिमंडळ पक्षप्रतोद आमदार भरत गोगावले यांच्या हस्ते व नगराध्यक्ष ज्ञानदेव पवार यांच्या उपस्थितीत उत्साहात झाला. या वेळी आमदार गोगावले यांनी पत्रकार संघाच्या कार्याचे विशेष कौतुक करीत पुरस्कार व सत्कारासाठी योग्य व्यक्तींची निवड केल्याचे सांगितले.

कार्यक्रमास व्यासपीठावर शिवसेनेचे रायगड जिल्हाप्रमुख प्रमोद घोसाळकर, उपनगराध्यक्ष राजेश मेहता, पत्रकार संघाचे अध्यक्ष सलीम शेख, उद्योजक विजय मेथा, भाजप महिला मोर्चाच्या प्रदेश चिटणीस यशोधरा गोडबोले, नगरपंचायतीचे स्वच्छता व आरोग्य समिती सभापती दिनेश रातवडकर, मुंबईचे उद्योजक प्रकाश जैन, डॉ. जमाल कुरुक्कर, ॲड. सदफ येलुकर, युवासेना उपजिल्हाप्रमुख अविनाश नलावडे आदी उपस्थित होते. त्याचप्रमाणे पत्रकार संघाचे कार्याध्यक्ष मजिद हाजिते, ज्येष्ठ सल्लागार आजेश नाडकर, उपाध्यक्ष प्रभाकर मसुरे, निलेश म्हात्रे, कायदेशीर सल्लागार ॲड. केदार गांधी, सहसचिव स्वप्ना साळुंके, प्रवक्ता संतोष गायकवाड, कार्यक्रमास विशेष सहकार्य करणारे सहकारी प्रा.हर्षल जोशी, शंकर शिंदे, संगणकतज्ज्ञ भालचंद्र खाडे, शिक्षक शब्बीर हज्जू, शिक्षिका अपूर्वा जंगम, एकता ग्रामीण टेनिस क्रिकेट असोसिएशनचे संस्थापक राहुल दसवते आदींसह नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

या वेळी पत्रकारांना पुरस्कार देऊन तसेच विविध क्षेत्रात उल्लेखनीय कामगिरी बजावणाऱ्यांचा सत्कार करून गौरविण्यात आले.



## एक संवाद आशा स्वयंसेविकांसाठी; रोह्यात उपक्रम

**रोहे : प्रतिनिधी**

सुदर्शन केमिकल इंडस्ट्रीज लिमिटेड अंतर्गत सीएसआर प्रमुख माधुरी सणस यांच्या मार्गदर्शनाखाली वरसे ग्रामपंचायत येथे रोहा तालुक्यातील सर्व आशा स्वयंसेविकांसाठी एक संवाद आशांसोबत हा संवाद मार्गदर्शन कार्यक्रम आयोजित करण्यात आला होता.

या वेळी लेखक, सामाजिक कार्यकर्ते, व्यसनमुक्ती प्रेरणा संवर्धन तज्ज्ञ किशोर काळोखे यांनी समजुतदार, सहनशीलता, सुसंवाद ,समुदाय संवाद या विषयी मार्गदर्शन केले. स्वाती पवार यांनीदेखील मनोबल वाढवणे या संदर्भात मार्गदर्शन केले.

या कार्यक्रमास तालुक्यातील एकुण १२५ आशा स्वयंसेविका, तालुका आरोग्य सहाय्यक श्री. झावरे, कॉर्डीनेटर श्री. मुंडे, सुदर्शन केमिकल इंडस्ट्रीज लिमिटेड सीएसआर विभागाचे वरिष्ठ अधिकारी चेतन चौधरी उपस्थित होते. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन व आभार अमर चांदणे यांनी व्यक्त केले.



# भारतीय महिलांची ऐतिहासिक कामगिरी

## ऑस्ट्रेलियाविरुद्ध कसोटी क्रिकेटमध्ये साकारला विजय

**मुंबई : प्रतिनिधी**

भारतीय महिला संघाने ऑस्ट्रेलियाविरुद्ध पहिल्यांदाच कसोटी सामना जिंकत इतिहास रचला आहे. मुंबईतील वानखेडे स्टेडियमवर झालेला ऑस्ट्रेलियाविरुद्धच्या एकमेव कसोटी सामन्यात टीम इंडियाने 'कांगारूं'चा तब्बल आठ गडी राखून धुव्वा उडवला.




मुंबईतील वानखेडे स्टेडियमवर भारत आणि ऑस्ट्रेलियाच्या महिला क्रिकेट संघांमध्ये एकमेव कसोटी सामना खेळला गेला. रविवारी (दि. २४) सामन्याच्या चौथ्या दिवशीच भारतीय संघाने शानदार विजयाची नोंद केली. तिसऱ्या दिवसाचा खेळ संपेपर्यंत ऑस्ट्रेलियाने दुसऱ्या डावात ५ बाद २३३ धावा केल्या होत्या. त्यांच्याकडे ४६ धावांची आघाडी होती. 'कांगारूं'चा संघ चौथ्या दिवशी दुसऱ्या डावात २६१ धावांवर सर्वबाद झाला. त्यांना एकूण ७४ धावांची आघाडी मिळाली. त्यामुळे भारताला विजयासाठी ७५ धावांचे लक्ष्य मिळाले. टीम इंडियाने हे लक्ष्य एक विकेट गमावत सहजरित्या पार केले.

स्मृती मानधनाने दुसऱ्या डावात भारताकडून सर्वाधिक नाबाद ३८ धावा केल्या. रिचा अंजनाने १३ धावा केल्या. जेमिमाह रॉड्रिग्ज १२ धावांवर नाबाद राहिली. शफाली वर्माला केवळ चार धावा करता आल्या. ऑस्ट्रेलियाकडून किम गर्थ आणि अॅशले गार्डनर यांनी प्रत्येकी एक विकेट घेतली. ऑस्ट्रेलियाविरुद्धच्या कसोटी सामन्यात भारताला पहिला विजय मिळाला आहे.

दोन्ही संघांमध्ये १९७७पासून आतापर्यंत ११ कसोटी सामने झाले आहेत. ऑस्ट्रेलियाने चार विजय मिळवले आहेत. सहा कसोटी अनिर्णित राहिल्या आणि आता भारताला एक विजय मिळाला.

# एक धाव अनाथ मुलांसाठी!

## कामोठ्यात मॅरेथॉन; आमदार प्रशांत ठाकूर यांच्या हस्ते उद्घाटन




**पनवेल : रामप्रहर वृत्त**

छाबा फाऊंडेशन दरवर्षी विविध सामाजिक ध्येय घेऊन कामोठ्यात मॅरेथॉन आयोजित करते. त्यानुसार यंदाच्या वर्षी एक धाव अनाथ मुलांसाठी हे घोषवाक्य घेऊन रविवारी (दि.२४) मॅरेथॉन आयोजित करण्यात आली होती. या स्पर्धेला रयत शिक्षण संस्थेच्या लोकनेते रामशेठ ठाकूर विद्यालयापासून सुरुवात झाली. आमदार प्रशांत ठाकूर यांनी झेंडा दाखवून स्पर्धेचे उद्घाटन केले.

या मॅरेथॉनला कामोठेवासीयांचा उत्स्फूर्त प्रतिसाद लाभला. स्पर्धेवेळी पनवेल महापालिकेचे माजी सभागृह नेते परेश ठाकूर, भाजपचे कामोठे शहर अध्यक्ष रवींद्र जोशी, माजी नगरसेवक डॉ. अरुणकुमार भगत, विकास घरत, युवा नेते हॅप्पी सिंग, हर्षवर्धन पाटील, विद्या तामखडे, रमेश तुपे, भाऊ भगत, सुशील शर्मा, युवा मोर्चा अध्यक्ष तेजस जाधव, छाबा फाउंडेशन ट्रस्टचे




अध्यक्ष दामोदर चव्हाण, सचिन तांबोळी, शेखर जगताप, हरजिंदर कौर यांच्यासह पदाधिकारी, छाबा फाऊंडेशनचे पदाधिकारी आणि नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

या वेळी बोलताना आमदार प्रशांत ठाकूर म्हणाले की, छाबा फाउंडेशनच्या वतीने दरवर्षी विविध ध्येयवाक्य घेऊन मॅरेथॉनचे आयोजन केले जाते. त्यातून इतर संस्थांना समाजकार्य करण्याची प्रेरणा मिळते.




**उलवे नोड : रामशेठ ठाकूर इंटरनॅशनल स्पोर्ट्स कॉम्प्लेक्सचा जलतरणपटू प्रभात कोळीला देश-विदेशात बजावलेल्या उल्लेखनीय कामगिरीबद्दल बंगळुरू येथे झालेल्या रोटरी क्लबच्या आंतरराष्ट्रीय स्तरावरील सोहळ्यात गौरविण्यात आले. याबद्दल प्रभात व त्याचे मार्गदर्शक वडील राजू कोळी यांचा माजी खासदार लोकनेते रामशेठ ठाकूर, आमदार प्रशांत ठाकूर यांच्या हस्ते स्पोर्ट्स कॉम्प्लेक्समध्ये सत्कार करण्यात आला. या वेळी भाजपचे ज्येष्ठ नेते वाय.टी. देशमुख, तालुका अध्यक्ष अरुणशेठ भगत, स्पोर्ट्स कॉम्प्लेक्सचे चेअरमन तथा महापालिकेचे माजी सभागृह नेते परेश ठाकूर आदी उपस्थित होते.**

## तारा येथील विद्यालयात क्रीडा स्पर्धा रंगली

**पनवेल : वार्ताहर**

पनवेल तालुक्यातील तारा येथील भान्येन प्रवीण शहा माध्यमिक विद्यालयात वार्षिक क्रीडा स्पर्धा नुकतीच आयोजित करण्यात आली होती. या स्पर्धेला विद्यार्थ्यांचा प्रतिसाद लाभला.

स्पर्धेचे उद्घाटन युसूफ मेहरअली सेंटरचे सचिव मधु मोहित यांच्या प्रमुख उपस्थितीत झाले. या वेळी कर्नाळा ग्रामपंचायतीचे माजी उपसरपंच विद्याधर जोशी, दिनेश पाटील, दीपक पाटील, सुयोग पाटील, मुख्याध्यापक जनार्दन म्हात्रे, शिक्षक, शिक्षकेतर कर्मचारी उपस्थित होते. या वेळी खो-खो, लंगडी, व्हॉलीबॉल, डॉज बॉल, धावणे, उंच उडी अशा अनेक प्रकारच्या खेळांमध्ये विद्यार्थ्यांनी सहभाग घेऊन आनंद लुटला. आजच्या मोबाईलच्या युगात मैदानी खेळाचे महत्त्व याबाबत मान्यवरांनी मार्गदर्शन केले.



**पनवेल : कै. अनिल नामदेव मुलसरे व गोविंद पांडुरंग मालुसरे यांच्या स्मरणार्थ लोणिवली येथील गावदेवी क्रिकेट संघाच्या वतीने आमदार चषक स्पर्धा रविवारी आयोजित करण्यात आली होती. या स्पर्धेला भाजप तालुकाध्यक्ष अरुणशेठ भगत यांनी भेट दिली. त्यांचे आयोजकांकडून स्वागत करण्यात आले. सोबत भाजप तालुका उपाध्यक्ष संजय पाटील, सरचिटणीस भूपेंद्र पाटील उपस्थित होते.**

## कुस्ती महासंघाची कार्यकारिणी बरखास्त

**नवी दिल्ली : वृत्तसंस्था**

क्रीडा मंत्रालयाने भारतीय कुस्ती महासंघ (डब्ल्यूएफआय) वर मोठी कारवाई केली आहे. डब्ल्यूएफआयची कार्यकारिणी बरखास्त करण्यात आली आहे.


वादग्रस्त माजी अध्यक्ष ब्रिजभूषण सिंह यांचे निकवर्तीय असलेल्या संजय सिंह यांची डब्ल्यूएफआय अध्यक्षपदी निवड झाली होती. या निवडीनंतर आघाडीच्या कुस्तीपटूंमध्ये नाराजीचे वातावरण निर्माण झाले होते. त्यामुळे क्रीडा मंत्रालयाने 'डब्ल्यूएफआय'वर मोठी कारवाई करीत कार्यकारिणीच बरखास्त केली आहे. यानंतर कुस्तीपटू गीता फोगाटने 'एक्स' (ट्विटर) अकाउंटवर कुस्तीपटूंना न्याय मिळेल, अशी आशा व्यक्त केली आहे.




विलास समीनदार
यांना वाढदिवसाच्या
हार्दिक शुभेच्छा
शुभेच्छुक : रोशन घाग



वाढदिवसाच्या अभिष्टचिंतन...



भाजपा कार्यकर्त्या
सौ. अंजली इनामदार
यांना वाढदिवसाच्या
हार्दिक शुभेच्छा!



भाजपा
सौजन्य : सौ. सुहासिनी केकाणे



वर्ष ४० वे ||ॐ श्री बाळकृष्णाय नमः || स्थापना १९८२

मार्गशिर्ष शुद्ध (त्रयोदशी) ते दत्तजयंती मार्गशिर्ष शुद्धपौर्णिमा अखंड हरिनाम सप्ताह
श्री स.स. बाळकृष्ण महाराज अध्यात्मिक ज्ञानमंदीर, शिवाजीनगर

राजाधिराज श्री समर्थ सद्गुरुनाथ भाऊसाहेब महाराज की जय || राजाधिराज श्री समर्थ सद्गुरुनाथ मिरीमल्लेश्वर महाराज की जय ||
राजाधिराज श्री समर्थ सद्गुरुनाथ बाळकृष्ण महाराज की जय || राजाधिराज श्री समर्थ सद्गुरुनाथ दादा महाराज की जय ||
राजाधिराज श्री समर्थ सद्गुरु भाऊसाहेब महाराज की जय || श्री. स.स. प्रमिचैतन्य महाराज की जय ||
गुरु चरणी ठेवीता भाव | आपोआप भेटे देव ||



श्री समर्थ सद्गुरु बाळकृष्ण महाराज (नंदेश्वर) | श्री समर्थ सद्गुरु भाऊसाहेब महाराज (नंदेश्वर) | स्वानंद सुखनिवासी संयोजक स्मृती पिताजी श्री. चांगू काना ठाकूर | स्वानंद सुखनिवासी संयोजक स्मृती माताजी श्रीमती भागुबाई चांगू ठाकूर | श्री समर्थ सद्गुरु दादामहाराज (मुंबई)

अनंत कोटी ब्रम्हांडनायक श्री समर्थ सद्गुरु बाळकृष्ण महाराज यांच्या आशिर्वादाने व स्वानंद सुखनिवासी चांगू काना ठाकूर व स्वानंद सुखनिवासी भागुबाई चांगू ठाकूर यांच्या प्रेरणेने पूनीत शिवाजीनगर माऊली मंदिरामध्ये श्री.स.स. बाळासाहेब महाराज नंदेश्वर. यांच्या शुभहस्ते श्री. बाळकृष्ण महाराज यांचे गुरु चरित्रामृत ग्रंथ, श्री दासबोध ग्रंथ, एकनाथ भागवत ग्रंथाचे पारायण पर्वणी प्रारंभ मार्गशीर्ष शुध्द ||१३||, शके १९४५, रविवार दि.२४/१२/२०२३ रोजी सकाळी १०.०० वा. प्रारंभ ते मार्गशीर्ष शुध्द ||१५|| पौर्णिमा शके १९४५, दत्तजयंती मंगळवार दि.२६/१२/२०२३ रोजी दुपारी १२.०० वा. माऊलीवर पुष्पवृष्टी होणार आहे. सर्व भागतील गुरुबंधू, भाविक भक्तांनी उपस्थित राहून आपला देह सार्थकी लावावा. तसेच भजन, प्रवचन कार्यक्रमास आपली उपस्थिती प्रार्थनिय आहे.

नित्याचे कार्यक्रम

| सकाळी | सकाळी | सकाळी | सकाळी | दुपारी | दुपारी | सायंकाळी | सायंकाळी | रात्री |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| ०५ ते ०६ | ०६ ते ०९ | ०९ ते १० | १० ते १२ | १२ ते ०१ | ०२ ते ०६ | ०६ ते ०७ | ०७ ते ०८ | ०९ ते ११ |
| काकड आरती | श्रीची नित्यपुजा | संगित भजन | प्रवचन | दुपारची आरती | संगित भजन | संध्याकाळची आरती | ग्रंथ वाचन व ध्यान | भजन व किर्तन |

दैनंदिन कार्यक्रम

संयोजक
श्री. रामशेठ ठाकूर
(मा. खासदार, रायगड)
ठाकूर परिवार आणि ग्रामस्थ मंडळ, शिवाजीनगर

कार्यक्रमाचे स्थळ
श्री.स.स. बाळकृष्ण महाराज अध्यात्मिक ज्ञानमंदिर, शिवाजीनगर, मु. शिवाजीनगर, पो. गव्हाण, ता. पनवेल, जि. रायगड.
फोन नं. ९१६७९९१०४५

प्रसंगानुसार कार्यक्रमात फेरबदल करण्यात येईल.
कार्यक्रमाच्या वेळेला महत्व दिले जाईल.

सोमवार दिनांक २५/१२/२०२३

| | |
|---|---|
| सकाळी ८ ते १० वा. संगित भजन | श्री. राधाकृष्ण भजन मंडळ, शिवाजीनगर; बुवा : रशिक कानडा आणि मंडळी; पखवाज : कु. परितोष हातचांगे (बेलपाडा); तबला : रुतुजा कानडा |
| स. १० ते १२ वा. प्रवचन | श्री. स.स. बाळासाहेब महाराज, नंदेश्वर; श्री. भागवत साहेब (पुणे); ह.भ.प. आप्पा पांचाळ (चिपळूण) |
| दुपारी २ ते ४ वा. | श्री. विश्वंभर भजन मंडळ (गव्हाण), गायक : हेमंत कोळी, पखवाज : प्रशांत कोळी, रविराज कोळी आणि मंडळी |
| दुपारी ४ ते ६ वा. | विठ्ठल रखुमाई हरिपाठ मंडळ, कोपर; गायिका : सौ. अनुसया घरत, सौ. इंदुताई म्हात्रे, सौ. नंदा पाटील, सौ. आनंदी घरत, सौ. अनिता म्हात्रे, सौ. वासंती ठाकूर, वादक : दिनेश घरत. |
| रात्री ८ ते ९ वा. संगीत भजन | एकादशी भजन मंडळ, न्हावे; बुवा : रामनाथ पाटील आणि मंडळी |
| रात्री ९ ते ११ किर्तन | श्री. हभप पुरुषोत्तम महाराज (रोहा, धाटाव) |
| रात्री ११ नंतर | रात्रीचे बारा अभंग, जागर भजन; रमन ठाकूर, शिवाजी ठाकूर, गजानन ठाकूर, पद्माकर ठाकूर (न्हावाखाडी), पांडुरंग रसाळ, आत्माराम मोकल, पद्माकर ठाकूर (शिवाजीनगर), किसन मोकल, मधुकर ठाकूर. |

मंगळवार दिनांक २६/१२/२०२३

| | |
|---|---|
| सकाळी ८ ते १० वा. संगीत भजन | नादब्रह्म साधना भजन मंडळ (रांजणपाडा, ओवेपेठ); देवसागर साधक समाज सामुदायिक संगित भजन; बुवा : निवृत्ती चौधरी, अक्षय चौधरी (रांजणपाडा), ज्ञानेश्वर म्हात्रे, वसंतशेठ पाटील, गणपत ठाकूर, नितीन ठाकूर, सुरेश ठाकूर, डॉ. निवृत्ती म्हात्रे, रामनाथ पाटील, महेश पाटील (न्हावा), भाऊ ठाकूर (शिवाजीनगर) |
| स. १० ते १२ वा. प्रवचन | श्री. स. स. बाळासाहेब महाराज, नंदेश्वर |
| दुपारी १२ वाजता | श्री. बाळकृष्ण माऊलीवर पुष्पवृष्टी |

- व्यवस्थापक -
देवसागर साधक समाज (इंचगिरी सांप्रदाय),
शिवाजीनगर - गव्हाण-खारकोपर
न्हावे - न्हावेखाडी - (संचलित)


दैनिक राम प्रहर या वृत्तपत्रातून प्रसिद्ध होणाऱ्या जाहिरातीतील सेवा, उत्पादने अथवा त्यासंदर्भातील कोणत्याही दाव्यांची वा उपयोगाची कोणतीही हमी वा जबाबदारी मल्हार नेटवर्क प्रा. लि. अंतर्गत दैनिक राम प्रहर घेणार नाही. दैनिक राम प्रहर या वृत्तपत्रातून प्रसिद्ध होणाऱ्या विविध जाहिरातींची खातरजमा व शहानिशा वाचकांनीच करून संबंधितांशी व्यवहार करावेत. त्यासंदर्भात प्रसिद्ध झालेल्या दाव्यांच्या पूर्ततेची, तसेच कोणत्याही मजकुराची कोणतीही हमी वा जबाबदारी मल्हार नेटवर्क प्रा. लि. अंतर्गत दैनिक राम प्रहरचे मुद्रक, प्रकाशक, संपादक वा मुख्य संपादक यांच्यावर राहणार नाही, याची दैनिक राम प्रहरच्या वाचकांनी आणि जाहिरातदारांनी नोंद घ्यावी. **–मुख्य संपादक**

हे पत्र मालक मल्हार नेटवर्क प्रा. लि. करिता मुद्रक, प्रकाशक कृष्णा चांगू ठाकूर यांनी सिद्धकला प्रिंट मीडिया अॅण्ड पब्लिकेशन्स प्रा. लि., डब्ल्यू २३० टीटीसी इंडस्ट्रियल एरिया, एमआयडीसी, ठाणे-बेलापूर रोड, कोपरखैरणे, नवी मुंबई ४०० ७१० येथे छापून अस्पायर प्राईड, गाळा नं. ४, रुपाली चौक, पनवेल. ४१० २०६. रायगड येथून प्रकाशित केले. RNI Regn. No. MAH MAR/2008/26534, **मुख्य संपादक : देवदास मटाले**. पोस्टल परवाना क्र. एनएमबी/१२०/२०२०-२२. कार्यालय संपर्क : दूरध्वनी ०२२-२७४८०१००, २७४९०१०० e-mail : ramprahar@gmail.com